दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –८५ | रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-85 | Sunday, Dt.30 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4



# तुतारीच्या दोनच चेहऱ्यांना मतदार वैतागले..?

## धोकेबाज जिल्हाध्यक्ष आणि दिशाहीन यंत्रणा पराभवास होणार कारणीभूत..!

बीड / वैभव स्वामी

**बीड नगरपालिका निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे विजयाची हमी निर्माण झाली होती. आमदार संदीप भैया आणि माजी आमदार सय्यद सलीम यांचे असलेले नेटवर्क आणि सामान्य जनतेशी असलेला संवाद लक्षात घेता ही निवडणूक एकतर्फी होण्याची शक्यता होती मात्र या विद्यमान आणि माजी आमदारांनी इतर कुणालाही सोबत आणि विश्वासात न घेता आपल्याच तोऱ्यात निवडणूक हाती घेतल्यामुळे आता या दोनच चेहऱ्यांना मतदार देखील वैतागले आहेत. त्यामुळे निवडणुकीतील चित्र शेवटच्या क्षणात पलटले असून तुतारीने नगराध्यक्ष पदासह त्यांच्याच पतींना नगरसेवक पदासाठी उमेदवारी दिल्यामुळे बीड नगरपालिकेत फक्त मिया बीवीचे राज होईल. याला प्रखर विरोध सुरू झाल्यामुळे आता निवडणुकीचे चित्र बदलणार आहे. त्यातच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कुचकामी ठरत असलेली यंत्रणा आणि धोकेबाज असा शिक्का असलेल्या जिल्हाध्यक्षांच्या छबीमुळे बीड नगरपालिकेत मोठा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत आता खऱ्या अर्थाने रंगत येण्यास सुरुवात झाली आहे. अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपली संपूर्ण ताकद बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत लावली आहे. बीडचे पालकमंत्री हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणजेच दस्तूर खुद्द अजित दादा पवार बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत बारकाईने लक्ष ठेवून आहेत. प्रत्येकाशी संवाद साधत आहेत. त्यांच्यासाठी ही निवडणूक पालकमंत्री असल्यामुळे प्रतिष्ठेची झाली आहे. कदाचित यामुळेच शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी बीड नगरपालिकेच्या निवडणुकीकडे आपली पाठ फिरवली आहे का अशी चर्चा होत आहे. आता निवडणूक शेवटच्या टप्प्यात आली आहे. मात्र अद्याप पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एकाही वरिष्ठ नेत्यांची सभा, कॉर्नर बैठका किंवा वरिष्ठ नेत्यांचे फोन त्यांचे संपर्क बीडच्या उमेदवाराला निवडून द्या असे कुठेही आवाहन केलेले जाहीरपणे दिसून येत नाही.यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातीलच अनेक मातब्बर नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते बेचैन झाल्याची अवस्था आहे. दुसरीकडे या पक्षाचा गाडा बीड विधानसभेचे आमदार आमदार संदीप भैया क्षीरसागर हे आपल्या एकट्याच्या हिमतीने ओढत आहेत. त्यांना खंबीरपणे माजी आमदार सय्यद सलीम हे पाठबळ आणि साथ देत आहेत. मात्र सलीम भाई यांचा चेहरा जरी आश्वासक असला तरी देखील मुस्लिम मतदार हा नगराध्यक्ष पदासाठी आपल्या हक्काचा उमेदवार निवडला जावा या भूमिकेवर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे पाठ फिरवत असतानाचे चित्र निर्माण झाल्याने पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची भंबेरी उडली आहे.त्यातच आमदार संदीप भैया क्षीरसागर यांची सक्षम असलेली यंत्रणा नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर त्यांना सोडून बाहेर पडली आणि आता ज्या यंत्रणाकडे निवडणुकीची जबाबदारी दिली आहे ती यंत्रणा अकार्यक्षम, दिशाहीन असल्यामुळे विजयाच्या उंबरठ्यावर असलेला हा पक्ष आज खऱ्या अर्थाने अडचणीत आला आहे. त्याला जबाबदार आमदारांची अकार्यक्षम यंत्रणाच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.





### अति आत्मविश्वास आत्मघातकी ठरणार..?

बीड लोकसभेत मिळालेले घवघवीत यश आणि विधानसभा निवडणुकीत मिळालेले निसटते यश यामुळे शरद पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील विद्यमान आमदार,माजी आमदार,जिल्हाध्यक्ष यासह सर्व पदाधिकाऱ्यांना अति आत्मविश्वास निर्माण झाला आहे की, नगराध्यक्ष पदासह बहुमताने नगरसेवक आपलेच निवडून येणार.त्यामुळे ते त्यांना जे जे समर्थन स्वतःहून देत आहेत त्यांना सुद्धा सोबत घेत नाहीत. हा विजय आमच्याच स्वबळावर मिळणार असा जो आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला आहे तोच त्यांच्यासाठी निकालानंतर आत्मघातकी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### अजित दादांच्या सभेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पारडे जड.. आता मुख्यमंत्र्यांच्या सभेकडे लक्ष..?

काल बशीरगंज येथे अजित दादांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची निर्णायक सभा झाली. या सभेला मिळालेला मतदारांचा प्रतिसाद आणि दादांनी केलेले संवेदनशील आवाहन घडाळ्याला नवसंजीवनी देणारे ठरले आहे. आता घडाळ्याचे वारे या सभेनंतर निर्णायक वळणाकडे जात असताना उद्या होणारी मुख्यमंत्र्याची सभा उपमुख्यमंत्री अजितदादांच्या वादळाला कितपत रोखते आणि आपले कमळ फुलवते हे मुख्यमंत्र्यांच्या सभेवर ठरणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांची सभा बीडमध्ये निर्णायक दिशा देणारी ठरेल अशी चर्चा रंगात आहे.

### पत्नी नगराध्यक्ष पदासाठी पती नगरसेवक पदासाठी वा रे राष्ट्रवादी..

शरद पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदासाठी सर्वसामान्यांना मान्य होईल असा विष्णू भैया वाघमारे या चेहऱ्याला म्हणजेच त्यांच्या सुविधा पत्नीला सौ स्मिता (समिता) विष्णू वाघमारे यांना संधी दिली. दुसरीकडे त्यांचेच पती जे मागील अनेक वर्षांपासून नगरसेवक आहेत. त्यांना सुद्धा नगरसेवक पदाची उमेदवारी दिली आहे.याचाच अर्थ लोक असा काढत आहेत की आमदार साहेबांना आपला नगराध्यक्ष निवडून येईल की नाही अशी शंका होती का ?म्हणून किमान नगरसेवक तरी निवडून यावा यासाठी दुहेरी उमेदवारी दिली आहे ? नवरा बायको दोघांनाही उमेदवारी दिल्यामुळे मात्र सामान्य मतदारांमधून उलटी रिएक्शन येत आहे.त्याचा फटका निश्चितच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना बसणार यात शंका नाही.

### आता लढत घड्याळ आणि कमळातच होणार..?

बीड नगराध्यक्ष पदासह नगरसेवकांची लढत ही शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत अशी दुहेरीच होईल आणि यामध्ये पुन्हा एकदा शरद पवार साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निर्विवाद विजय होईल अशी दाट शक्यता होती. मात्र अति आत्मविश्वासामुळे आणि कुचकामी यंत्रणेमुळे पवार साहेबांची तुतारी मागे पडली असून बीड नगराध्यक्ष पदासह खाली नगरसेवकांची सुद्धा लढत प्रामुख्याने अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ सोबत भारतीय जनता पार्टीच्या थेट कमळासोबत होणार आहे.असे चित्र आता शेवटच्या टप्प्यात उभारले गेल्यामुळे कमळ आता विजयाच्या शर्थीत येऊन ठेपले आहे. याला तुतारीचा आत्मविश्वासच कारणीभूत आहे अशी उघड चर्चा रंगत आहे.

### भाजपाच्या सुप्त यंत्रणेने अनेकांची झोप उडवली..?

भारतीय जनता पार्टीने कुठेही चर्चेत न येता बीड नगरपालिका आपल्या ताब्यात घेण्यासाठी मातब्बरांना कामाला लावले आहे.ही सुप्त यंत्रणा साधी नाही, या यंत्रणेचा शब्द मतदार तोडू शकत नाहीत आणि ही यंत्रणा सुप्तपणे मतदारांच्या मोहरक्यांचा विश्वास संपादत पुढे निघालेली आहे. त्यामुळे ही सुप्त यंत्रणा कदाचित भाजपाला विजयाच्या उंबरठ्यापर्यंत आणण्यामध्ये यशस्वी ठरलेली आहे. यामुळे बीडमध्ये धक्कादायक निर्णय सुद्धा लागू शकतो.

# बारामतीत, पिंपरी चिंचवड सारखा विकास बीडमध्ये करण्यासाठी एकदा संधी द्या - ना. अजितदादा पवार




## राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बीडच्या बशीरगंजमध्ये विराट जाहिर सभा

बीड /प्रतिनिधी

मी तुम्हाला समजून सांगायला आलोय, तुम्हाला ऐकायचे असेल तर ऐका, मी बारामतीत करून दाखवले आहे, मी पिंपरी चिंचवडमध्ये करून दाखवले आहे ते मला बीडमध्ये करायचे आहे. तुमची साथ असेल तर मी बीडमध्ये विकास करून दाखवेन, हा अजित पवारचा शब्द आहे आणि मी शब्दाला पक्का आहे, मी करून दाखवतो, मला फक्त संधी द्या. इथल्या सत्ताधाऱ्यांनी ३५ वर्षे आपल्या लोकांना वाऱ्यावर सोडून इथले मुलभूत प्रश्न रखडत ठेवले, आत्मपरिक्षण करा, डोळे उघडा, आता चांगली संधी आलेली आहे. माझ्या विचाराच्या माणसाला निवडून द्या, काळजी करू नका स्वतः उभे आहात असे समजून सद्सद् विवेक बुध्दीने मतदान करून मला बीडचा चेहरा-मोहरा बदलण्याची संधी मला द्या असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना-शिवसंग्राम-सपा व मित्रपक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या जाहिर सभेत ते बोलत होते. यावेळी विराट संख्येने उपस्थिती असल्यामुळे राष्ट्रवादी व मित्रपक्षांच्या उमेदवारांचा विजय निश्चित झाला आहे.

बीड नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शिवसेना-शिवसंग्राम-सपा मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाच्या ५२ उमेदवारांच्या प्रचारार्थ ना.अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील बशीरगंज चौक येथे जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजीमंत्री नवाब मलिक, आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निरीक्षक संजय दौड, शिवसंग्रामच्या राष्ट्रीय नेत्या श्रीमती ज्योतीताई मेटे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, अल्पसंख्यांक आघाडीचे शेख निजाम, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, तालुकाध्यक्ष राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक फारुक पटेल, राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.प्रज्ञाताई खोसरे, राष्ट्रवादीच्या युवती अध्यक्षा प्रिया डोईफोडे, रेखा फड, माजी नगराध्यक्ष मोईन मास्टर, दिलीप गोरे, झुंजार धांडे, सुहास पाटील, भागवत तावरे, पांडुरंग आवारे, सुनिल मगरे, गोरक्ष लोखंडे यांच्यासह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे तसेच सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. अजितदादा पवार म्हणाले की, बीड शहरात अनेक प्रश्न रखडत पडलेले आहेत. रस्ते नाहीत, नाल्या नाहीत, रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब आहेत, मुला-मुलींना खेळण्यासाठी क्रीडांगण नाही, उद्यान नाही, आलेला निधी खर्च केलेला नाही, रस्त्याच्या बाजूला झाडे लावलेली नाहीत असे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. विरोधकांनी ३५ वर्षे बीडची अवस्था बकाल करून टाकली, बारामती, पिंपरी चिंचवडचा विकास होवू शकतो मग बीडचा का नाही होवू शकत नाही ? असा प्रश्न उपस्थत करून तिकडे व्हिजन असणारे लोक आहेत आणि इकडे लोकांना वाऱ्यावर सोडून स्वतःचे घर भरणारे लोक असल्यामुळे आपली अवस्था अशी झालेली आहे. या भागातील खासदार झाले, आमदार झाले यांनी आत्तापर्यंत काय केले ? झोपा काढल्या का ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ज्ञानराधा, साईराम, माँसाहेब आणि छत्रपती अशा पतसंस्थांच्या कुटे, परभणे, शिंदे आणि भंडारी या लोकांनी सामान्य लोकांचा पैसा लुटला. त्यातल्या तिघांना आम्ही जेलमध्ये पाठवले, एक फरार आहे. चुकीला माफी नाही, काम करत असताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतील तेंव्हा सुधारणा होतील आणि सुधारणा करण्यासाठी आपल्या विचाराची माणसं नगर परिषदेत पाठवावी लागतील. तुम्ही कचरा निर्माण करणाऱ्या माणसाला निवडून द्याल तर या बीडचा कचरा होईल स्वच्छता करणाऱ्या स्वच्छ विचाराच्या माझ्या माणसांना विजयी करा असे सांगून हावसे-नवसे-गवसे येतील, रात्रीतून गडबड करतील त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका, येणाऱ्या २ तारखेला घडी आणि धनुष्यबाण या चिन्हासमोरचे बटन दाबून मला काम करण्याची संधी द्या असे कळकळीचे आवाहन ना. अजितदादा पवार यांनी केले.

(उर्वरीत पान २ वर)




## गेवराई भाजप कार्यालयाला ना. पंकजाताई मुंडे यांची सदिच्छा भेट; पदाधिकाऱ्यांकडून भव्य स्वागत

गेवराई : प्रतिनिधी


गेवराई शहरातील जुने बसस्थानक येथील भाजप कार्यालयात महाराष्ट्राच्या लोकप्रिय नेत्या तथा मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी भाजप पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांचा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान ना.पंकजाताई मुंडे यांच्या आगमनानंतर भाजपचे गेवराई तालुका समन्वयक श्रीकांत सानप यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.

गेवराई शहरातील जुने बसस्थानक याठिकाणी गेवराई भाजपचे तालुका समन्वयक श्रीकांत सानप यांच्या पुढाकाराने मागील काही महिन्यांपूर्वी भाजपा कार्यालय जनतेच्या सेवेत सुरु करण्यात आले होते. दरम्यान शुक्रवारी सायंकाळी ना. पंकजाताई मुंडे यांनी या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यानंतर पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना म्हटले की, गेवराईत कार्यकर्त्यांकडून मिळणारा उत्साह हा माझ्यासाठी ऊर्जा देणारा असतो. भाजपचे हे स्थानिक कार्यालय नेहमी सर्वसामान्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी कटिबद्ध आहे, आणि हीच सेवा परंपरा पुढेही सुरू राहावी,या सदिच्छा व्यक्त करतानाच गेवराई भाजपचे समन्वयक श्रीकांत सानप यांच्या कार्याची प्रशंसा केली. गेवराई तालुक्यात पक्षाची

(उर्वरीत पान २ वर)

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा बीड नगरपालिकेत कमळ फुलवणार !

### १ डिसेंबरच्या सभेला प्रचंड संख्येने उपस्थित राहून विजयाचे शिलेदार व्हा – भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा

बीड /प्रतिनिधी

बीड शहराच्या इतिहासात प्रथमच बीड नगर पालिकेत भाजपाची सत्ता येणार असून त्या दिशेने सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांसह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योतीताई घोमरे यांचा शहरात डोअर टू डोअर प्रचार भक्कमपणे सुरू आहे. निवडणूक प्रचाराच्या अंतिम टप्प्यात बीड शहर भाजपमुळे होत असून नगरपालिकेची सत्ता यावेळी बीडकर नागरिकांनी भाजपाच्या हाती सोपवण्याचा निर्धार केला आहे. राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची येत्या १ डिसेंबर २०२५ रोजी बीड शहरात भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या सभेने बीड नगरपालिकेसाठी भारतीय

(उर्वरीत पान २ वर)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

संपादकीय

# बिघडलेल्या हवेचे वर्तमान

मुंबईची हवा सध्या पूर्ण बिघडली आहे. राजकारणाने नाही; हवेतील धुलीकणांनी. राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका सुरू असल्याने राजकीय धुरळा सध्या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात उडतो आहे. मुंबईलगतच्या जिल्ह्यांमध्ये नेत्यांच्या झुंजी लागल्या आहेत. पण, महानगरपालिकांच्या क्षेत्राने वेढलेल्या मुंबईपासून या नगरपालिका थोड्या अंतरावर असल्याने त्या मैदानावरची धूळ मुंबईत पोहोचण्याचा प्रश्न नाही. मुंबईची हवा बिघडली आहे, ती मुंबईतल्याच घटकांमुळेच. सरकारी यंत्रणांनी याही बाबतीत आपल्यावरची जबाबदारीची धूळ झटकताना इथिओपियातील ज्वालामुखीचं कारण पुढे करून पाहिलं. पण, न्यायालयाने ऐकलं नाही. इथियोपियातल्या ज्वालामुखीतून उडालेल्या राखेचा काही अंश भारतीय अवकाशात आला आणि त्याचा काही भाग मुंबईच्या आकाशात पसरल्याने या आठवड्यात विमानसेवा विस्कळीत झाली होती, हे खरं. पण, न्यायालयाने या यंत्रणांना सुखासुखी सोडलं नाही. 'त्या राखेचं कारण सांगू नका. राख आली असली, तरी तिकडे ज्वालामुखीचा उद्रेक होण्याआधीही इथली हवा बिघडलेलीच होती. त्याचं कारण काय ते सांगा', असं न्यायालयानेच खडसावल्याने यंत्रणांना दुसरं कारण पुढे करावं लागलं. उगीच परकीय कारणांवर जबाबदारी झटकून मोकळं कशाला व्हायचं? बरं, या यंत्रणांना वायू प्रदूषण मान्य नाही, असं नाही. हे प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची यादी त्यांनी करून ठेवली आहे. वायू प्रदूषण किती पातळीपर्यंत सहन करायचं, प्रदूषणाची पातळी सलग तीन दिवसांपेक्षा अधिक २०० एक्यूआयपेक्षा वर राहिली, तर कोणी काय करायचं हेही ठरलं आहे. अधिकाऱ्यांच्या संयुक्त जबाबदाऱ्याही निश्चित आहेत. पण, तरीही 'शक्यतो काहीच करावं लागलं नाही तर उत्तम' या मुरलेल्या वृत्तीने इथिओपियाच्या ज्वालामुखीवर खापर फोडण्याचा प्रयत्न झाला. हवेतलं वायू प्रदूषण मोजण्यासाठी मुंबईत अनेक ठिकाणी मापन यंत्र बसवलेली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आयआयटी बॉम्बे आणि महानगरपालिका या तीनही यंत्रणांची यंत्र हवेची गुणवत्ता तपासत असतात. पण, दुर्दैवाने त्यात कुठेही सुसूत्रता दिसत नाही. अनेक यंत्र एकतर नादुरुस्त किंवा बंदच आहेत की काय कोणास ठाऊक? कारण, या यंत्रणांच्या अनेक केंद्रांवरची हवेच्या गुणवत्तेची आकडेवारी या महत्त्वाच्या दिवसांतही उपलब्ध नाही! याच यंत्रणेला न्यायालयाने आता सर्व बांधकामांच्या ठिकाणी हवेची शुद्धता मापक यंत्र बसवण्याचे आदेश दिले आहेत. बांधकामांच्या ठिकाणांची हवेची गुणवत्ता तपासा, जिथे हवा धोक्याच्या पातळीपर्यंत प्रदूषित असेल, तिथली बांधकामं तातडीने काही काळ थांबवा, असं न्यायालयाने आदेशात म्हटलं आहे. हे आदेश देताना अर्थात प्रकल्पाच्या आर्थिक गणिताचा विचार करायची सूचनाही केली आहे. न्यायालयाने दाखवलेली ही काळजी यंत्रणांसाठी (आणि संबंधित कंत्राटदारांसाठीही) पळवाट म्हणून उपयोगाला येईल, यात शंका नाही. दिल्लीतलं वायू प्रदूषण कमी दाखवण्यासाठी तिथल्या यंत्रणांनी हवेच्या गुणवत्ता मापक यंत्रांच्या भोवती पाणी मारण्यासाठी कसे टँकर लावले होते, हे आपण पाहिलेच आहेत. असे उपाय जे करतात, तेही याच प्रदूषित हवेतून श्वास घेतात. त्यांची कुटुंबही याच हवेतून प्राणवायू मिळवत असतात. पण, आपल्याकडे स्वतःच्या आणि इतरांच्या जगण्याच्या गुणवत्तेचा विचारच नसल्याने केवळ काही आमिषापोटी अशा गोष्टी केल्या जातात. आपण आपल्याबरोबरच इतरांचं आरोग्यही पणाला लावतो आहोत, याची जाणीव यांना नसते. त्यामुळे, मुंबईतही वेगळं काही घडेल, असं मानायला मन धजावत नाही. दिल्लीच्या वायू प्रदूषणाची तक्रार वर्षानुवर्ष आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब अशा जवळच्या राज्यांतील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातलं धसकट पेटवल्याने होणाऱ्या धुराने दिल्लीतली हवा बिघडते, असं वर्षानुवर्ष सांगितल्यानंतर यावर्षी या यंत्रणांनी वाहनांच्या वाढत्या उत्सर्जनाने हे प्रदूषण होतं आहे, असं सांगायला सुरुवात केली आहे. दिल्लीत घरात हवा शुद्ध करणारी यंत्र लागली आहेत. लोक ऑक्सिजनची पिशवी घेऊन, त्याची नळी नाकाला लावून फिरत नाहीत. पण ते दिवसही फार दूर नसतील. दिल्लीशी स्पर्धा करणाऱ्या मुंबईतही वेगळं काही घडणार नाही.

# गेवराई नगरपालिकेत हक्काच्या नगराध्यक्ष होणार गीताभाभी पवार

## मतदारांना, आता मतदान रुपी आशीर्वाद देऊन ऋणातून उतराई होण्याची संधी..!

**गेवराई /प्रतिनिधी**
**गेवराई शहरातील महिला, गोरगरीब व समस्याग्रस्त व्यक्तींच्या मदतीला धावून जाणारे गीताभाभी बाळराजे पवार नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक रिंगणात उभे आहेत. निवडणुकी पुरते नव्हे तर दररोज सकाळी महिला व गोरगरिबांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असलेल्या गीताभाभी पवार यांना मतदान रुपी आशीर्वाद देऊन ऋणातून उतराई होण्याची संधी आल्याचे महिला, सर्वसामान्य मतदारांमधून बोलले जात आहे.**

गेवराई नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी अंतिम टप्प्यात आली आहे. गेवराईचे नगराध्यक्ष पद हे सर्वसाधारण महिला वर्गासाठी सुटले. त्याचवेळी सर्वांसमोर गीताभाभी



बाळराजे पवार यांचे नाव पुढे आले. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी गीताभाभी बाळराजे पवार भाजपाकडून निवडणूक रिंगणात आहेत. नगराध्यक्ष पदाच्या गीताभाभी सक्षम उमेदवार म्हणून गणल्या जात असल्याने त्यांचे नाव निवडणुकीत पुढे आल्याने विरोधी गटात चलबीचल निर्माण झाली होती. गीताभाभी यांचा निवडणुकीत डोअर टू डोअर प्रचार सुरू आहे. निवडणुकी पुरते नाही तर नेहमीच जनतेस मिसळून काम करण्याची त्यांची सवय आहे. गेवराई शहरातील महिला व सर्वसामान्य घटकांना त्यांचा आधार वाटतो. दररोज सकाळीच शहरातील महिला भाभीच्या वाड्यावर येतात. आपल्या समस्या घराणे भाभीला सांगतात ते सोडून घेतात. त्याचबरोबर अनेक महिलांचे आपल्या अडीअडचणीचे फोन सकाळी सुरू होतात. त्या सोडवण्यासाठी गीताभाभी तत्पर असतात. त्याचबरोबर जिजामाता योगा ग्रुपच्या माध्यमातून शहरातील महिलांचे मोठे संघटन उभे केलेले आहे. बारा महिने या महिला जिजामाता योगा ग्रुपच्या माध्यमातून सकाळीच एकत्र येतात. योगाबरोबर सण, उत्सव व इतर उपक्रम साजरे करतात. हे महिला जे संघटन शहरभर गीताभाभीच्या प्रचाराला लागले आहेत. आपल्या हक्काची गीता भाभी नगराध्यक्षपदी विराजमान झाल्या पाहिजेत यासाठी या महिला कामाला लागले आहेत.

# बीड शहराच्या विकासासाठी काँग्रेसच्या हातासमोरील बटण दाबुन सर्व उमेदवारांना विजयी करा - गणेश बजगुडे पाटील

बीड /प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी व्हिजन असणारे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरलेली आहेत.खासदार रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांची ताकद यासर्व उमेदवारांच्या पाठीशी असुन बीड शहराच्या विकासासाठी काँग्रेसच्या पंजा समोरील बटण दाबुन सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन बीड तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.

बीड नगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु असुन मागील अनेक वर्ष बीडकराणी वारंवार अनेकाना मोठ्या अपेक्षेने निवडूण देण्याचे काम केले परंतु त्यांनी कुठल्याही प्रकारचा विकास शहराचा केलेला दिसत नाही. शहरवासीयांच्या ज्या समस्या पुर्वी होत्या त्याच आज देखील आहेत उलट शहराला भकास करण्याचे काम या मंडळीने केले आहे. बीड मध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस होऊन देखील आज शहरात नियमित व स्वच्छ पाणी पुरवठा होत नाही, घंटा गाडी नाही, रस्ते, लाईट, नाल्याचे प्रश्न कायम आहेत. शहरात ठीक ठिकाणी कचरा स्वच्छता नाही. आरोग्य, शिक्षण यासारखे अनेक प्रश्न शहरात आहेत. मोकाट जनावरे, कुत्री यांचा बंदोबस्त होत नाही. शहरात जेष्ठ नागरिक, महिला, बालकांसाठी कुठलेही सुसज्ज उद्यान नाही, पेन्शनरस पार्क नाही, सार्वजनिक शौचालय नाहीत, व्यायामशाळा नाहीत, क्रीडाप्रेमींना कुठलीच व्यवस्था नाही, पेठबीड भागात क्रीडा संकुलाचा प्रश्न मार्गी लागला नाही, शहराचे ग्रामदैवत कणकालेश्वर मंदिर, खंडेश्वरी मंदिर, शहेनशावली दर्गा यासारखे अनेक धार्मिक स्थळे देखील धोक्यात आहेत, महिला बचत गट आहेत मात्र बचतगटाच्या माध्यमातून महिलांसाठी कुठलेही मोठे उद्योग व्यवसाय उभारला जात नाही, धुळीचे आणि घाणीचे साम्राज्य असलेले शहर म्हणुन आज बीडची ओळख होत चाललेली आहे. आशा परिस्थितीत शहरवासीयांच्या हक्कासाठी व शहराला स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी शहरात महिला व तरुणाच्या हाताला काम



देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून अतिशय चांगली सुशिक्षित व शहराच्या विकासासाठी व्हिजन असणारी उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरलेली असुन खासदार रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांची ताकद यासर्व उमेदवारांच्या पाठीशी असुन बीड शहराच्या विकासासाठी काँग्रेसच्या पंजा समोरील बटण दाबुन सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन शिवक्रांती संघटनेचे नेते तथा बीड तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.

# पोर्टलच्या माध्यमातून हरवलेले व चोरीला गेलेले मोबाईल शोधून काढण्यात परळी शहर पोलीसांना यश

## हरवलेले मोबाईल पोलिसांमुळे परत मिळाल्याने पिढीतांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

बीड /प्रतिनिधी

परळी शहर पोलीस स्टेशन, जिल्हा बीड यांच्याकडून गुन्हे प्रतिबंध व नागरिकांच्या मालमत्तेचा शोध घेण्याच्या उपक्रमांतर्गत महत्त्वपूर्ण कारवाई करण्यात आली आहे. उएखठ पोर्टलच्या माध्यमातून हरवलेले व चोरीला गेलेले मोबाईल शोधून काढण्यात परळी शहर पोलीसांना यश मिळाले आहे.

या उपक्रमात उएखठ पोर्टलवरून व तक्रारीदार यांच्या प्राप्त तक्रारी व माहितीच्या आधारे पोलीस ठाणे परळी शहरच्या सायबर डेस्कचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्री अमोल शिंगणे व पोलीस अंमलदार श्री. प्रशांत शेळके यांनी सखोल तपास करून मागील एका महिन्यात एकूण वेगवेगळ्या कंपनी व किमतीचे एकुण ११ सुमारे २,५०,०००/- रुपये किंमतीच्या फोनचे शोध घेवून जप्त केले. संबंधित मोबाईलच्या मूळ मालकांची ओळख व मालकी हक्काची खात्री करून आज दिनांक २९/११/२०२५ रोजी परळी शहर पोलीस स्टेशन येथे जप्त मोबाईल पैकी ०७ मोबाईल मूळ मालकांना



त्यांच्या मोबाईलची सुपूर्दगी करण्यात आली. उर्वरीत ०४ मोबाईल हे तक्रारदार पोलीस ठाणेस हजर आलेनंतर त्यांना देण्यात येणार असल्याचे पोलीसांनी सांगितले.

परळी शहर पोलिसांच्या सायबर डेस्क तसेच तांत्रिक पथकाने या कारवाईत सक्रिय सहभाग नोंदविला आहे. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून पोलीस विभागाने त्वरित व प्रभावी कामगिरी केल्याबद्दल आभार व्यक्त केले आहेत. परळी शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व सायबर डेस्कचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्री.अमोल शिंगणे यांनी नागरिकांना सल्ला दिला आहे की मोबाईल हरवल्यास किंवा चोरी झाल्यास त्वरितः जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये अर्ज करावा उएखठ पोर्टलवर मोबाईलची खचएख नोंदणी करावी मोबाईल बिल किंवा खचएख क्रमांकाची नोंद सुरक्षित ठेवावी पुढेही अशा प्रकारच्या कारवाईद्वारे नागरिकांचा विश्वास जपण्याचा आणि गुन्हेगारीला आळा घालण्याचा कटाक्ष कायम ठेवला जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, मा. सहा. पोलीस अधीक्षक श्री. वेंकटरमन साहेब व पोलीस ठाणे परळी शहचे प्रभारी अधिकारी श्री. नाचण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परळी शहरच्या सायबर डेस्कचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्री अमोल शिगणे व पोलीस अंमलदार श्री. प्रशांत शेळके यांनी केली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश,**
**व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७५७ /२०२५,**
**ॲड. एम. एम. जोशी यांच्यामार्फत**
**विद्या भ्र. शहादेव रसाळ वि. निरंक**

ज्यापेक्षा शहादेव पि. त्रिंबक रसाळ हे दिनांक २४.०९.२०२५ रोजी मांजरसुंबा, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार

१.विद्या भ्र. शहादेव रसाळ, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. मांजरसुंबा, ता. जि. बीड.
२.नीरज पि. शहादेव रसाळ, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. मांजरसुंबा, ता. जि. बीड.
३.निकिता भ्र. सुभाष हजारे, वय २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. चाकरवाडी, ता. जि. बीड.
४.नेहा भ्र. मंगेश मेटे, वय २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मांजरसुंबा, ता.जि. बीड.

अर्जदार क्रं. १ ही मयत नामे शहादेव पि. त्रिंबक रसाळ यांची पत्नी आहे तर अर्जदार क्रं. २ हा मयताचा मुलगा आहे तर अर्जदार क्रं. ३ व ४ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. तसेच मयताचे आई, वडील यापूर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू **मयत शहादेव पि. त्रिंबक रसाळ** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**

पान १ वरून...

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस....**

जनता पक्षाचे विजयावर शिक्कामोर्तब होणार आहे.त्यामुळे या सभेला प्रचंड बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे

बीड नगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचत असून शहरातील सर्व २६ प्रभागातील ५२ उमेदवार आपल्या प्रभागातील नागरिकांच्या घरोघरी पोहोचून प्रभावीपणे प्रचार करत आहेत. नागरिकांनी ही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी यावेळी भारतीय जनता पक्षाला सत्तेत बसवण्याचा निर्धार केल्याच्या जनभावना शहरातील प्रभागा प्रभागात व्यक्त होत आहेत. शहरातील सर्व भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते एक दिलाने नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ नागरिकांच्या गाठीभेटी घेत त्यांचे आशीर्वाद घेत आहेत अशी माहिती भाजप शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी दिली असून यावेळी बीड नगरपालिकेत भाजपाचे सत्ता येणार असा विश्वासही लोढा यांनी व्यक्त केला आहे.

लोढा यांनी म्हटले आहे की, राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सक्रियतेने नगरपालिका निवडणूक 'विजयी भव'चा नारा घेऊन मतदारांपर्यंत पोहोचत आहेत. बीड शहरात ठिकठिकाणी भाजपाच्या नगरसेवक पदाच्या उमेदवारांसाठी जाहीर सभा, कॉर्नर बैठका, पदयात्रा काढल्या जात असून तरुण युवकांसह महिला भगिनींसह नागरिकांना पर्यंत पोहोचत आहेत. याच अनुषंगाने येथे १ डिसेंबर रोजी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विजयी संकल्प सभा बीड शहरात आयोजित करण्यात आली आहे.या सभेच्या माध्यमातून बीड नगरपालिकेत भाजपाच्या विजयावर शिक्का मुहूर्त होणार आहे त्यामुळे या सभेला बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शहराध्यक्ष लोढा यांनी केले आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जनतेने भाजपाला सत्ता देण्याचा ठाम निर्धार केला आहे असा विश्वासही अशोक लोढा यांनी व्यक्त केला आहे.

**गेवराई भाजप ...**

घडी बसवणे, नवे कार्यकर्ते जोडणे, प्रत्येक गावात संघटनाचा मजबूत पाया उभारणे या सर्व गोष्टींमध्ये श्रीकांत सानप यांनी अतिशय परिश्रमपूर्वक आणि निष्ठेने काम केले आहे. जनसंपर्क, संघटन बांधणी वाढवण्यात त्यांची भूमिका प्रचंड मोलाची आहे. आज गेवराई तालुक्यात भाजपची वाढ, कार्यकर्त्यांची संख्या आणि पक्षाचा प्रभाव वाढण्यामागे त्यांचे सततचे श्रम आणि समर्पण मोठ्या प्रमाणात

पान १ वरून...

जाणवते. एक कार्यकर्त्यांपासून समन्वयक पदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा पक्षनिष्ठेचा आदर्श आहे. अशाच जोशात ते जनसेवा आणि संघटन बळकटीसाठी कार्यरत राहोत, या सदिच्छा शेवटी पंकजाताई मुंडे यांनी दिल्या. यावेळी माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपचे नेते बाळराजे पवार, प्रकाशराव सुरवसे, अँड.सुरेश हात्ते, पी. टी. चव्हाण, तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे, राजेश पवार ,ज्ञानेश्वर खाडे, मनोज पाटील, उद्धव रासकर, अशोक शिंदे, साईनाथ सुरवसे, संतोष थोरात, विकास पवार, प्रदीप उगलमुगले, गणेश सातपुते, सुशील भोपळे, रामचंद्र कोळेकर, सुनील ढाकणे, मच्छिंद्र यादव, सतीश ढाकणे, रंजित शर्मा, पप्पू खेडकर,यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

**बारामतीत, पिंपरी चिंचवड......**

यावेळी बोलताना माजीमंत्री नवाब मलिक म्हणाले की, ही निवडणुक बीडचे भविष्य बदलणारी निवडणुक आहे, मनात किंतु-परंतु न ठेवता, प्रशासकीय अनुभव असणाऱ्या प्रेमलता पारवे यांच्यासह मित्रपक्षाचे सर्वच्या सर्व उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी करा. ना. अजितदादा पवार यांच्यासारखा विकास पुरुष आपल्या पाठिशी आहे, त्यांच्या माध्यमातून बीडची बारामती करा, सर्व धर्म समभाव विचार घेऊन आम्ही, सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करत आहोत, तेंव्हा आपल्या विचाराची माणसं सत्तेत पाठवा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना डॉ.ज्यातीताई मेटे म्हणाल्या की, विरोधकाने नगर पालिकेचा वापर स्वार्थी राजकारण करण्यासाठी केला, अटल अमृत योजनेचा निधी कुठे गेला ? याचा जबाब तुम्ही त्यांना विचारला पाहिजे. विकासाचा ताळेबंद घेऊन चर्चा करा, बीड नगर परिषदेमध्ये परिवर्तन करण्याची संधी चालून आलेली आहे. त्यासाठी घड्याळ चिन्हासमोरचे बटन दाबून सर्व उमेदवारांना विजय करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.


यावेळी दिलीप गोरे व भागवत तावरे यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच सतिष क्षीरसागर, गौतम मोरे, आरेफ खान, फेरोज खान यांनी ना. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला.

ना. अजितदादा पवार यांच्या माजलगाव, धारुर येथील जाहिर सभा झाल्यानंतर त्यांनी बशीरगंज चौकात जाहिर सभेच्या ठिकाणी आगमन होताच लगेच भाषणाला सुरुवात केली. आपल्या भाषणात त्यांनी बीडमध्ये काय करायचे आहे याचा विकास आराखडाच मांडला. त्यांच्या या सभेला महिला, पुरुष मतदार व कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. सभास्थळी मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद आणि उत्साह राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाच्या सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाला आहे.

# बीड नगर परिषदेच्या चाव्या दहशतवाद्यांच्या नाही तर देशभक्त भाजपच्या ताब्यात द्या - ॲड.सर्जेराव तांदळे

बीड(प्रतिनिधी):- बीड मध्ये नगर परिषद निवडणूक २०२५ होत आहे.निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून दिनांक २ डिसेंबर २०२५ वार मंगळवार रोजी मतदान पार पडणार आहे.या निवडणुकीमध्ये विविध पक्षाचे उमेदवार उभे असून भारतीय जनता पार्टीचा उमेदवार उच्च विद्या विभूषित आहे.दोन्ही राष्ट्रवादी व एम आय एम चे मार्ग हे विकासाच्या दिशेने जात नसून दहशतवादाच्या दिशेने जातात या पक्षाने नेहमी दहशतवाद्यांचे उद्यातीकरण केलेले आहे.भारत देश साडे सातशे वर्ष मोगलांच्या,निजामाच्या गुलामगिरीत होरपळून निघाला होता त्यामुळे बीड शहरातील व जिल्ह्यातील जागरूक मतदार बांधवांनी या पक्षांना मतदान न करता कट्टर देशभक्त व विकासाची दूरदृष्टी असणाऱ्या भारतीय जनता पार्टी या पक्षाच्या अधिकृत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योतीताई रवींद्र घुंबरे व प्रभागातील सर्व भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवक पदाचे अधिकृत उमेदवारांना कमळाचे बटन दाबून मोठ्या मताधिक्याने विजय करावे तसेच

भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात नगर



परिषद आल्यानंतर नगर परिषद डिजिटल पद्धतीने चालवणार तसेच संपूर्ण कारभार हा पारदर्शकपणे चालवणार,समाजातील शेवटच्या घटकापर्यंत नगरपालिकेच्या माध्यमातून केंद्र सरकार,राज्य सरकारच्या विविध योजना पोहचवनार,नागरिकांनी नगर परिषद मध्ये नव्हे तर नगर परिषद नागरिकांपर्यंत घेऊन जाऊ बीड शहराच्या उज्वल भविष्य साठी, स्वच्छ शहर सुंदर शहर करण्यासाठी संधी द्यावी असे आव्हान भाजपा राज्य परिषद सदस्य ड.सर्जेराव तात्या तांदळे यांनी केले आहे..

# बीडकरांची साथ कायम मिळाली या निर्णयाक वळणावर देखील मतदार पाठीशी राहणार - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

## बीड नगरपालिकेत नगराध्यक्ष पदासह बहुमताने कमळ फुलणार हे माळीवेसच्या सभेने केले शिक्कामोर्तब

बीड /प्रतिनिधी

शहरातील प्रभाग क्रमांक २ मधून आम्हाला कायमच मतांची आघाडी मिळाली आहे. त्यामुळे या प्रभागावर विशेष लक्ष देऊन विकासकामे करण्यात आली आहेत. पूर्वी येथे केवळ अरुंद रस्ता होता. तो रुंद करून मोठा व दर्जेदार रस्ता तयार करण्यात आला. पूर्वीचा आणि आजचा रस्ता यातील फरक नागरिकांच्या लक्षात येतो. बीडकरांची आजपर्यंत जशी साथ मिळाली, तसेच यापुढेही मिळणार, याची मनात तीळमात्र शंका नाही, असा विश्वास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केला.शहरातील माळीवेस येथे नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे, प्रभाग क्र.२ मधील भाजपचे उमेदवार शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे यांच्या प्रचारार्थ जयदत्त क्षीरसागर यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिनकरराव कदम, सखाराम मस्के, माजी नगरसेवक भारत यादव, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, अजय सवाई, संगीताताई धसे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेदरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मीनाताई अरुण कांबळे व विष्णू यादव यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी त्यांचे स्वागत करण्यात आले. बीड नगरपरिषद भाजपच्या ताब्यात आणण्यासाठी सर्वांनी जोमाने प्रयत्न करावेत, असे आवाहनही करण्यात आले. जयदत्त क्षीरसागर म्हणाले, या प्रभागातील जनता आमच्यासाठी जिवाभावाची आहे. इथून आम्हाला नेहमीच मोठे मताधिक्य मिळते. मतदारांनी आपल्या मर्जीतील, जनतेची सेवा करणाऱ्या उमेदवारांना निवडून द्यावे. या प्रभागात मोठे बाजारपेठ विकसित झाली असून आजची परिस्थिती पाहिली तर विकास झाल्याचे स्पष्ट दिसते. मूलभूत सुविधा या नगरपालिकेशी निगडित असल्याने त्या सक्षम लोकांच्या हाती देणे गरजेचे आहे. राज्यात जनहिताचे सरकार असल्याने खालपासून वरपर्यंत एकाच विचाराची सत्ता असावी. विकासकामांना अडथळा आणणाऱ्यांना घरी बसवा आणि 'कमळ' समोरील बटन दाबून तिन्ही उमेदवारांना भरघोस मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.



### अण्णा, अध्यक्षसाहेबांच्या माध्यमातून विकास-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड शहरात सर्वाधिक आघाडी देणारा प्रभाग म्हणजे प्रभाग क्रमांक २ असल्याचे सांगत डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, प्रत्येक निवडणुकीत या प्रभागाने आम्हाला भरभरून पाठबळ दिले आहे. येथे जवळपास सर्वच विकासकामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे आगामी काळात पूर्ण केली जातील. या भागात मोठे सिमेंट रस्ते झाले आहेत. माळी समाजाचे दैवत असलेल्या संत सावता महाराज मंदिरासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न झाले. जयदत्त क्षीरसागर यांच्या माध्यमातून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करून भव्य सभागृह उभारण्यात आले आहे. त्यामुळे अनेक गोरगरिबांची सामाजिक कार्ये येथे पार पडणार आहेत. या प्रभागातील काम करणाऱ्या लोकांनाच प्राधान्य देण्यात आले असून शुभम धूत, सावित्री नितीन साखरे आणि नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# प्रभाग क्र.६ मध्ये महायुतीची रिक्षा दौड; सचिन खरात-खुर्शीद जिलाणींची धडाकेबाज लाट

## लोकांच्या मनात विश्वास प्रचारात प्रचंड वेग विजयाची चाहूल स्पष्ट

अंबड /प्रतिनिधी

नगर परिषद निवडणूकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक ६ मध्ये सध्या राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. कारण महायुतीचे (रासप) उमेदवार सचिन खरात आणि खुर्शीद जिलाणी या अभेद्य जोडीने संपूर्ण प्रभागात जणू विकासाची धडाकेबाज लाट आणली आहे. त्यांची रिक्षा' (पक्ष चिन्ह) आता केवळ एक निवडणूक चिन्ह नसून ती विकासाचा आणि विश्वासाचा विजयरथ बनली आहे जो अत्यंत वेगाने पुढे सरकत आहे.



जात-धर्मापलीकडचे नेतृत्व

प्रभागात या जोडीची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची सर्वसमावेशक आणि मनमिळावू कार्यशैली.जात-धर्माच्या भिंती तोडून त्यांनी सर्व समाजाला सोबत घेतले आहे.लोकांच्या सुख-दु:खात सर्वप्रथम धावून जाणारे आणि प्रत्येकाशी आत्मियतेने संवाद साधणारे नेतृत्व म्हणून त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.त्यांच्या या जनतेच्या नेत्या प्रतिमेमुळे मतदारांचा प्रचंड विश्वास त्यांच्यावर व्यक्त होत आहे.

विकास हेच एकमेव सूत्र

या जोडीने केवळ आश्वासने दिली नाहीत तर प्रभागातील समस्यांवर तत्परतेने लक्ष केंद्रित करून त्यांच्या निराकरणाची ठोस दिशा दिली आहे. गल्लोगल्लीतून आणि चौकाचौकातून आता एकच आवाज घुमत आहे प्रभाग ६ मध्ये खऱ्या अर्थाने विकास तर सचिन खरात-खुर्शीद जिलाणीच

जनतेचा वाढता प्रतिसाद कार्यकर्त्यांचा दणकेबाज उत्साह आणि समाजाची एकदिलाने मिळणारी साथ यामुळे विरोधकांमध्ये प्रचंड गोंधळ उडाला आहे. प्रचारसभेत आणि पदयात्रेत होणारी लोकांची अलोट गर्दी या जोडीच्या आक्रमक आकर्षक आणि दमदार प्रचारशैलीची साक्ष देत आहे.

विजयी गर्जना

विकासाचे वारे वाहू लागले... प्रभाग क्रमांक ६ सज्ज झाला सचिन खरात-खुर्शीद जिलाणींचा विजयरथ वेगाने पुढे सरकला जनतेचा वाढता पाठिंबा स्पष्टपणे दर्शवतो की प्रभाग क्रमांक ६ आता एका नव्या



# बीड पोस्टल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी अमरसिंग ढाका यांची बिनविरोध निवड

## उपाध्यक्षपदी किरण सावंत तर सचिव पदी नितीन आमटे यांची बिनविरोध निवड

बीड /प्रतिनिधी

बीड पोस्टल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड संस्थेच्या संचालक मंडळातून उर्वरित कालावधीसाठी अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांची निवड करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. संचालक मंडळाची सभा दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आली होती या सभेमध्ये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी बीड पोस्टल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड या संस्थेच्या संचालक मंडळातून अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांची निवड करण्यासाठी मुख्य पोस्ट ऑफिस येथे सभा घेण्यात आली या सभेमध्ये अध्यक्षपदासाठी अमरसिंग ढाका यांचा एकमेव अर्ज आला व त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली ते या अगोदर सचिव म्हणून कार्यरत होते.तसेच उपाध्यक्ष पदासाठी ही किरण सावंत यांचा व सचिव पदासाठी नितीन आमटे यांचाही एकमेव अर्ज आला व तिघांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या प्रचाराची दखल अडचण कोणाला, कोणाचे धाबे दणाणले?

माजलगाव (प्रतिनिधी): - माजलगाव नगरपालिका निवडणुकीत आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे हे भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ उतरले आहेत. दमदार आणि लोकाभिमुख शैलीत ते मतदारांशी संवाद साधत असून त्यांचे उपस्थित राहणे हे राजकीय समीकरणांवर थेट परिणाम घडवणारे ठरत असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी प्रचार करू नये यासाठी प्रशासनाला पुढे करून गलिच्छ राजकारण कोणीतरी खेळत असल्याचे उघड झाले आहे. मात्र आपण नगरपालिकेवर भाजपाचा झेंडा फडकविल्याशिवाय शांत बसणार नसल्याचे डॉ. शेटे यांनी खडसावून सांगितले.

माजलगाव शहरात शुक्रवारी दुपारी पत्रकार कमलेश जाबरस यांच्या दुकानात डॉ. ओमप्रकाश शेटे पत्रकार बांधवांशी संवाद साधत होते. तेवढ्यात नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर तेथे आले, व मला तुमच्याशी बोलायचे आहे असे म्हणून त्यांनी आपण प्रचारादरम्यान शासकीय गाडीचा वापर करत असल्याची तक्रार मिळाल्याचे सांगितले. हे ऐकून डॉ.



शेटे यांचा पारा चढला. त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना सांगितले की, मी माझे मित्र बंडू खांडेकर यांची MH 12 FG 4624 (क्रेटा) ही गाडी वापरत आहे. ही पहा मी वापरत असलेली गाडी या दुकानासमोरच उभी आहे. कोणी तक्रार दिली त्याचे नाव सांगा? मात्र मुख्याधिकाऱ्यांनी तक्रारदाराचे नाव सांगण्यास नम्रपणे नकार दिला व मिळालेल्या तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आल्याचे सांगून ते निघून गेले.

सदरील घटनेमुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी प्रचारात भाग घेऊ नये यासाठी कोणीतरी केविलवाना प्रयत्न करत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. मात्र ज्यांनी कोणी तक्रार दिली त्या बालिश बुद्धीच्या व्यक्तीला हे समजू नये की, आचारसंहितेमध्ये शासकीय गाडी वापरता येत नाही, हे राज्यस्तरीय समितीवर काम करणाऱ्या डॉ.शेटे यांना माहित नाही काय? मात्र याचा अर्थ एकच निघतो की, डॉ. ओमप्रकाश शेटे भाजपा उमेदवाराच्या प्रचारात उतरल्यामुळे कोणाचे तरी नक्कीच धाबे दणाणले आहे.

### मी थांबणारा कार्यकर्ता नाही

यावर प्रतिक्रिया देताना डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शिष्य आहे त्यामुळे संघर्ष माझ्या रक्तात आहे. सधन व सुसंस्कृत असलेल्या माजलगाव शहराला सत्ताधाऱ्यांनी बकाल केले आहे. शहराला या अवस्थेतून बाहेर काढून स्वच्छ, सुंदर व आरोग्य युक्त बनविण्यासाठी भाजपाची सत्ता आणण्यासाठी मी जीवाचे रान करणार आहे. 'मै लंबी रेस का घोडा हुं' असल्या थातूरमातूर गोष्टीमुळे थांबणारा कार्यकर्ता नाही.

# स्वच्छ, सुंदर व आरोग्ययुक्त माजलगाव साठी भाजपा हाच एकमेव पर्याय - डॉ. ओमप्रकाश शेटे

## झंजावाती प्रचार दौऱ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य

माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव सारख्या सुसंस्कृत व प्रगतशील शहराला स्वच्छ, सुंदर व आरोगयुक्त बनवायचे असेल तर भारतीय जनता पार्टी हाच एकमेव पर्याय असल्याचे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केले. नगरपालिका निवडणूक प्रचारादरम्यान डॉ. शेटे यांनी शहरातील विविध भागात कॉर्नर बैठका व जाहीर सभांचा धडाका लावला आहे. तसेच त्यांनी घराघरात जाऊन भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजय करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळत असून त्यामुळे भाजपाचे पारडे जड झाले असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य पसरले आहे.

माजलगाव नगरपालिका निवडणुकीला रंग चढू लागला असून प्रचारयुद्धात राजकीय तापमान वाढत आहे. भारतीय जनता पार्टी कडून डॉ. ओमप्रकाश शेटे हे तीन - चार दिवसांपासून भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. दमदार आणि लोकाभिमुख शैलीत ते मतदारांशी संवाद साधत असून त्यांचे प्रचारात उपस्थित राहणे हे राजकीय समीकरणांवर थेट परिणाम घडवणारे ठरत असल्याचे दिसून येत आहे. डॉ. शेटे



यांच्या झंजावाती प्रचारामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले असून भाजपाने प्रचारात आघाडी घेतली आहे.

केंद्रात व राज्यात भा.ज.पा.चे सरकार आहे, त्यामुळे शहराचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर नगरपालिकेत सुद्धा त्याच पक्षाची सत्ता असणे क्रमप्राप्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख योजना राबविण्यात आल्या आहेत. विद्यार्थी, तरुण, महिला व वृद्धांच्या प्रगतीसाठी सरकारने पुढाकार घेतला आहे. शहराला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर भाजपाचे सर्व उमेदवार प्रचंड मतांनी निवडून द्या असे आवाहन शेटे यांनी केले. शेतकरी, कष्टकरी, नोकरदार, शहरी व ग्रामीण असा भेदभाव न करता 'सबका साथ सबका विकास' हे ब्रीद घेऊन देवाभाऊ काम करत आहेत. त्यांचे हात बळकट करण्यासाठी व सर्वांगीण विकास साधण्यासाठी शहरवासीयांनी पुढे येऊन भाजपच्या सर्व उमेदवारांना मतदान केले पाहिजे असेही ते म्हणाले. माजलगाव हे शहर प्रगतशील व सुसंस्कृत आहे. मात्र मागच्या काळात भ्रष्ट राजकारण्यांनी शहराला बकाल केले आहे. धरण उशाला व कोरड घशाला अशी लोकांची अवस्था आहे. आठ आठ दिवस नळाला पाणी येत नाही. शहरात कचऱ्यांचे प्रचंड ढीग लागले आहेत. नाल्या तुंबल्यामुळे रस्त्यावर चालणे सुद्धा मुश्किल होत आहे. गल्लीबोळात वागण्यायोग्य रस्ते नाहीत. प्रचंड घाणीचे साम्राज्य असल्यामुळे साथीच्या रोगाने लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत स्वच्छ, सुंदर व आरोग्ययुक्त माजलगाव साठी भाजपा हाच एकमेव पर्याय असल्यामुळे मतदारांनी भाजपचे सर्व उमेदवार प्रचंड मतांनी विजयी करावेत असे आवाहन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी माजलगावकरांना केले आहे.



बीड - प्रभाग क्रमांक १३ अ मधून सौ. मिना भीमराव वाकचौरे आणि १३ ब मधून सौ जयश्री विलासराव विधाते या राष्ट्रवादीच्या उमेदवारांना त्यांच्या प्रामाणिक कामाची दखल घेऊन मतदारांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यामुळे हे दोन्ही उमेदवार घड्याळ या चिन्हावर विरोधकांचे डिपॉझिट गुल करून विजयी होतील असे चर्चा मतदारांमधून होत आहे.



बीड - दैनिक प्रजापत्राचे संपादक संजय मालानी यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर सर, पत्रकार संघाचे मा प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, जेष्ठ पत्रकार मंगेश निटूरकर यासह मान्यवर.



बीड - प्रभाग क्रमांक ११ ब मधून नगरसेवक पदाचे अपक्ष उमेदवार शशिकांत उर्फ पिंटू भगवानराव माने यांच्या अंगठी या निशाणाला मतदारांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या प्रभागाचे राजकीय गणित अस्थिर होणार आहे अशी चर्चा मतदारांमधून होत आहे.

# घड्याळ खोक्यात बंद करून ठेवा

## पंकजाताई, प्रितमताईंच्या सभेने गेवराईत कमळ फुलणार





गेवराई (प्रतिनिधी)

आपण पालकमंत्री असतांना गेवराईच्या विकासाला सातत्याने झुकते माप दिले. अनेक कामांसाठी लक्ष्मण पवार यांनी सातत्याने पाठपुरवा केला. त्यामुळे गेवराईत मोठ्या प्रमाणात कामे झाली. भविष्यातही गेवराईच्या कोणत्याही कामांसाठी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पर्यंत आपण जावू, त्यासाठी आपण नगर पालिका निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना आणि नगराध्यक्ष पदासाठी उभे

असलेल्या गिताभाभी पवार यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, सध्या घड्याळ कपाटात बंद करून ठेवा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी काल गेवराईच्या सभेत केले. माजी खा. प्रितमताई मुंडे यांनीही यावेळी भुमिका स्पष्ट करतांना गेवराई तालुका आणि शहर सातत्याने मुंडे घराण्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. त्याच पध्दतीने आम्ही ही बाळराजे पवार आणि बदामराव पंडित यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असे

आश्वासन यावेळी प्रितमताई यांनी दिले. लोकसभा निवडणुकीनंतर प्रथमच पंकजाताई मुंडे यांची गेवराईत सभा झाली. या सभेमुळे भाजपाच्या विजयावर एक प्रकारे शिक्कामोर्तबच झाला आहे. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भाषणामध्ये विकासाच्या मुद्दयाबरोबरच आगामी काळात करण्यात येणाऱ्या कामांचाही लेखा जोखा मतदारांसमोर मांडला

गेवराई नगर पालिका निवडणुकीमध्ये प्रथमच नगराध्यक्षपदासाठी गिताभाभी पवार या निवडणुक रिंगणात आहेत. त्यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेत पंकजाताई मुंडे यांची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी आ. बदामराव पंडित, बाळराजे पवार, माजी आ. लक्ष्मण पवार, सौ. गिरीकाभाभी पंडित, युध्दजित पंडित, शिवराज पवार यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना पंकजताई मुंडे म्हणाल्या की, गेवराई शहराच्या विकासासाठी पवार कुटूंबिय सातत्याने प्रयत्नशिल असते. लक्ष्मण पवार यांनी सतत पाठपुरावा करून पाणी पुरवठा योजना, नाट्यगृह, मागील पंधरा वर्षात नगर पालिकेचा कारभार पवारांनी कशा पध्दतीने चालविला हे गेवराईकरांनी पाहिले आहे. त्यामुळेच गेवराईचा चेहरा बदलला आहे. गेवराई स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी काही पर्यावरणाचे उपक्रम आपण राबवू त्यासाठी मी स्वतः प्रयत्न करेल तसेच महामार्ग आणि गेवराई शहरात येणाऱ्या रस्त्याचे सुशोभिकरण यासाठी मी स्वतः केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे जावून तो प्रश्न मार्गी लावू तसेच महिला बचत गटातील महिलांच्या उत्पादनांना मार्केट मिळावे त्यासाठी स्वतंत्र इमारत उभी करू, सर्वसामान्य कुटूंबातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे त्यामुळे नगर पालिकेच्या निवडणुकीत गिताभाभी पवार यांच्यासह सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. माजी खा. प्रितमताई मुंडे यांनी देखिल त्यांच्या खासदारकीच्या काळात लक्ष्मण पवार आणि बदामराव पंडित यांनी सातत्याने विकासाची कामे करून घेण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगितले. बाळराजे पवार यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. त्यामुळे गेवराई शहराचा चेहरामोहरा आगामी काळात बदल्याशिवाय राहणार नाही असेही प्रितमताई मुंडे म्हणाल्या.

गेवराई नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गिता भाभी पवार यांच्यासह सर्व प्रभागातील सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ ना.पंकजाताई मुंडे व मा. खा. प्रितम ताई मुंडे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, मा.आ. बदामराव पंडीत, बाळराजे पवार, गिरी का भाभी पंडीत ,भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.गिताभाभी बाळराजे पवार, युध्दाजित पंडीत, प्रा.पि.टी. चव्हाण, श्रिकात सानप, सुरेश रांका, ॲ. इंदानी, सुरेश हात्ते, ता. अध्यक्ष सचिन दाभाडे, उध्दव रासकर, राजेश पवार, आदी उपस्थित होते

### बाळराजेंचे अभ्यासपूर्ण भाषण

बाळराजे पवार यांनी विकासाचा अहवालच पंकजाताई मुंडे यांच्या हातात दिला. एवढेच नव्हे तर आगामी काळात गेवराई शहरामध्ये काय विकास कामे करावी लागतील ते कशा पध्दतीने करावी लागतील, सर्व जाती धर्मांसाठी आणि सलोखा राखण्यासाठी विकास कामे करतांना त्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. गेवराई तालुक्याच्या राजकारणात अमरसिंह पंडित यांनी बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची कशी फसवणूक केली हेदेखिल बाळराजे यांनी स्पष्ट केले. ५ कोटी खर्च करून बाजार समिती उभारली मात्र त्याचा शेतकऱ्यांना किती फायदा झाला याचा लेखा जोखा त्यांनी द्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. गेवराई शहर हे एक स्मार्ट शहर करण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या योजनांची माहिती उपस्थितीतांना दिली. त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाने पंकजाताई मुंडेंनीही त्यांचे कौतूक केले,


### स्व. गोपीनाथ मुंडे आणि बदामरावांच्या नात्याची पंकजाताईंना आली आठवण

जिल्ह्याच्या राजकारणामध्ये माझे वडील स्व. गोपीनाथराव मुंडे यांना सुरूवातीपासूनच बदामराव पंडित यांनी खंबीरसाथ दिली. मुंडे साहेबांचाही त्यांच्यावर मोठा विश्वास होता. बदामराव आबांचे आणि आमच्या घराण्याचे मागील अनेक वर्षापासून स्नेहपुर्वक संबंध आहेत. आबा कोणत्याही पक्षात असले तरी त्यांनी आम्हाला सातत्याने पाठींबाच दर्शविलेला आहे. त्यामुळेच स्व. गोपीनाथ मुंडे यांना दोन्ही लोकसभेत आणि त्यानतर प्रितमताई मुंडे यांना लोकसभेत गेवराई तालुक्याने मोठे मताधिक्य दिलेले आहे असेही पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

---

# महिलांच्या सबलीकरणासाठी आयुष्य वाहिले ; आता गेवराईच्या व्यापक विकासासाठी तुमचा आशीर्वाद हवा - सौ. गीताभाभी पवार

## गेवराईत सर्वत्र कमळाच्या फुलाचाच सुगंध ; सौ.गीताभाभीची विजयी घोडदौड कायम



गेवराई (प्रतिनिधी) पंधरा वर्षांपासून आम्ही नगरपरिषदेसाठी काम केले, मी महिलांसाठी लढले, बचत गटांना सक्षम केले. आता गेवराईच्या व्यापक विकासासाठी पुन्हा एकदा तुमच्या आशीर्वादाची गरज आहे, अशा भावनिक शब्दांत भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीता भाभी बाळराजे पवार यांनी गेवराईकरांना आवाहन केले.

गेवराई शहरातील विविध भागातील प्रचार बैठकीत त्यांनी मतदारांशी संवाद साधला या प्रसंगी त्या बोलत होत्या. नगरपरिषदेत गेल्या दशकात काम करताना मिळालेल्या अनुभवाची आठवण करून देताना गीता भाभींनी सांगितले की, शहरात काम करताना आम्ही नगरपरिषद क्षेत्रातील ३५० बचत गटांना सक्षम केले. महिलांना आर्थिक बळकटी मिळावी म्हणून बचत गटांच्या माध्यमातून दहा कोटींची उलाढाल घडवून आणली. महिलांसाठी योगसाधना, दर तीन महिन्यांनी मोफत आरोग्य तपासणी ही असे सर्व उपक्रम मी स्वतः उभे केले. त्यामुळेच आजपर्यंत महिलांनी आमच्या पवार कुटुंबावर विश्वास टाकला.

कठीण परिस्थितीतील आपल्या संघर्षाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले, माझे पती १५ वर्षे तुरुंगात होते. त्या काळात मी दोन मुलांना सांभाळले, घरही पाहिले आणि समाजकारणही प्रामाणिकपणे केले. गेवराईकरांच्या प्रत्येक सुखदुःखात मी धावून गेले. या लोकसंग्रहामुळे आज मी तुमच्यासमोर उभी आहे. म्हणून पुन्हा एकदा पवार कुटुंबाला आपल्या आशीर्वादाची गरज आहे. या भाषणात त्यांनी मनातील वेदनाही व्यक्त केली. आमच्या स्वतःच्या नातेवाईकांनी ज्यांना तुम्ही ‘बीडचे पंडित’ म्हणता त्यांनी आम्हाला खूप त्रास दिला. नातेवाईकांकडून अन्याय सहन करावा लागणे ही मोठी शोकांतिका आहे. पण मी कधीही खचले नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. आजपर्यंत जसे गेवराई करांच्या हितासाठी काम केले तसेच यापुढे ही गेवराईच्या विकासासाठी आम्ही मनापासून काम करू. तुमचे पाठबळच माझी खरी ताकद आहे. म्हणून येत्या २ तारखेला मला आणि भाजपच्या सर्व उमेदवारांना तुमच्या मतदानरूपी आशीर्वादाने सन्मानित करा. गीताभाभींच्या या भावनिक व प्रामाणिक अवाहनाने गेवराईकरांची मने जिंकली असून निवडणुकीच्या तोंडावर भाजपच्या छावणीत नवी ऊर्जा संचारली असून गीताभाभीचा विजय पक्का झाला असल्याचे दिसून येत आहे.

# गेवराईची राष्ट्रवादी पराभव समोर दिसू लागल्यामुळे बावचळली अँड उध्दव रासकर



गेवराई- नगरपरिषद नगराध्यक्ष व नगरसेवकाच्या निवडणूक प्रचाराची भव्य व विजयी सभा नामदार पंकजताई मुंडे यांची झाली या सभेमध्ये नामदार पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षाचे उमेदवार गीता भाभी बाळराजे पवार व वीस सदस्यांच्या विजयाचा शिक्कामोर्तब केला भाजपाची ही भव्य दिव्य सभा पाहून गेवराई राष्ट्रवादी बावचळली आहे.

सभा झाल्यानंतर नामदार ताई साहेबांच्या भाषणामधील काही भाग कट करून सोशल मीडियावर अपप्रचार सुरू केला आहे ताई साहेबांनी भाषणामध्ये जनतेसमोर सांगितले की घड्याळाकडे लक्ष द्या मी घड्याळ काढून ठेवते तुम्ही पण दोन तारखेपर्यंत कपाटात काढून ठेवा. यातील घड्याळाकडे लक्ष द्या एवढीच क्लिप कट करून सोशल मीडियावर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते अपप्रचार करत आहेत हा सगळा प्रकार हास्यास्पद आहे यातून राष्ट्रवादीचे नेते व कार्यकर्त्यांच्या बुद्धीची किव करावयासी वाटते. यातून निष्पन्न होते की ताईसाहेबां शिवाय गेवराई नगरपालिका निवडणूक होऊ शकत नाही व ज्यांच्या बाजूने नामदार पंकजाताईसाहेब मुंडे आहेत त्यांचा विजय ठरलेला आहे त्यामुळे जनतेची दिशाभूल करण्यासाठी आशा भाषणाचा काही भाग कट करून सोशल मीडिया टाकून मतदारांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न राष्ट्रवादीचे नेते व कार्यकर्ते करत आहेत नगराध्यक्षाचे उमेदवार सौ

गीता भाभी बाळराजे पवार प्रचंड मतांनी निवडून येणार आहेत यात तिळमात्र मात्र शंका नाही . पराभव समोर दिसू लागल्यामुळे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते बावचळले आहेत असे मत गेवराईभाजपाचे तालुकाध्यक्ष (प) अँड उध्दव रासकर यांनी व्यक्त केले आहे

---



## गुड टच आणि बॅड टच याबाबत लवकरच जनजागृती करणार -डॉ भाग्यश्री घाळे

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून लहान मुलांवरील अत्याचारांच्या अनेक संतापजनक घटना समोर येत असतानाच, बालकांमध्ये व पालकांमध्येही गुड टच आणि बॅड टच याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने डॉ भाग्यश्री घाळे यांनी तयार केलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण गीताचे छायांकन नुकतेच पूर्ण झाले आहे. या गीताचे लेखन डॉ.भाग्यश्री घाळे यांनी केले असून, याचे चित्रीकरण/छायांकन उदगीर येथील ब्राईट स्टार हायस्कूल येथे संपन्न झाले.

या गीताच्या मुहूर्ताचा कार्यक्रम प्रा. डॉ. वीरभद्र घाळे यांच्या हस्ते पार पडला. मुलांना समजेल अशा सोप्या आणि प्रभावी शैलीत गुड टच-बॅड टच या विषयावरील माहिती डॉ. भाग्यश्री घाळे यांनी या गीतातून मांडली आहे. यापूर्वी त्यांनी उझठ या महत्त्वपूर्ण वैद्यकीय विषयावरही एक जनजागृती गीत लेखनबद्ध केले असून, त्या मागील दहा वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात आपली सेवा बजावत आहेत.

या गीताचे दिग्दर्शन श्री. कृष्णा काकरे यांनी केले असून, छायांकन गुलाब चव्हाण, तसेच पोस्टर डिझाईन मनोज झुंगा यांनी केले आहे. ब्राईट स्टार हायस्कूल आणि मानसी प्रोडक्शन्स यांच्या संयुक्त विद्यमाने हे गीत प्रदर्शित करण्यात येणार आहे. लहान मुलांमध्ये जागरूकता वाढावी, त्यांना चांगले-वाईट ओळखण्याची समज विकसित व्हावी, आणि एक डॉक्टर तसेच एक आई म्हणून मुलांबद्दलच्या काळजीतून व आपुलकीतून हे गीत तयार केल्याचे डॉ. भाग्यश्री घाळे यांनी सांगितले.

हे गीत लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून, त्याचे प्रसारण लवकरच त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर करण्यात येणार आहे,तसेच ब्राईट स्टार हायस्कूल मध्ये या गीताचे विशेष प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे.

# विरोधकांना धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ - आ. विजयसिंह पंडित

## प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात वारं फिरलं, घड्याळाने घेतली आघाडी





बीड/ प्रतिनिधी

बीड शहरातील जनतेच्या जीवावर विरोधकांनी ३५ वर्ष नगर परिषदेची सत्ता भोगली पण या भागाचा विकास केला नाही. जनतेला मुलभुत सुविधा देऊ शकले नाही उलट ऐनवेळी पक्षाला व सामान्य कार्यकर्त्यांना धोका देवून ईतर पक्षात पळुन गेले. कार्यकर्ते आणि सामान्य जनतेचा विश्वासघात करणाऱ्यांना धडा शिकवण्याची हीच योग्य वेळ आहे आहे असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शिवसेना, शिवसंग्राम- स.पा. व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बीड शहरातील विविध भागात आयोजित केलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. दरम्यान बार्शीनाका येथे झालेल्या सभेला विराट गर्दी झाल्यामुळे राष्ट्रवादी व मित्रपक्षाच्या सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले आहे.

बीड नगरपरिषद सार्वत्रीक निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष--शिवसेना-शिवसंग्राम-स.पा.व मित्रपक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे व प्रभाग क्र. नगरसेवक पदाचे उमेदवार मोमीन सीमा परवीन अब्वदुल रशिद व जैतुल्ला खान फैजुल्ला खान व प्रभाग क्र.२२ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार शेख शबाना खय्यूम व शेख निजाम जैनुद्दीन व प्रभाग क्रं.२३ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार मोमीन जुबेर अहेमद मुन्शी मिया व शेख बिस्मिल्ला पाशामिया यांच्या संयुक्त प्रचारार्थ मोमीनपुरा मक्काई चौक परिसर बीड येथे तर प्रभाग क्र.२४ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार शेख शिरीन सुलताना सत्तर शाह व श्रीमती केशरबाई तुळशीराम गलधर तर प्रभाग क्रं.२६ मधील श्रीमती कांबळे विद्या सुशिल व शेख इलियास युनूस यांच्या संयुक्त प्रचारार्थ राज गल्ली परिसर, अशोक नगर, बार्शी नाका परीसर व मोमीनपुरा मकाई चौक, बीड येथे आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी नगराध्यक्ष मोईन मास्टर, दिलीपराव गोरे, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे, बळीराम गवते, छत्रपती संभाजीनगर येथील काझी साहाब, स्वप्नील गलधर, झुंझार धांडे, खमरूद बागवान, पांडूरंग आवारे पाटील, शेख मुजीबभाई, फारुख पटेल, शेख निजाम भाई, डॉ.कादरी फक्करूद्दीन,भागवत तावरे,अनिल घुमरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, शिवछत्र परिवार सदैव तुमच्या सोबत आहे या भागातील रस्ते, पुल, नाल्या,घरकुलाचे प्रलंबीत प्रश्न व पिण्याचे पाणी नियमित देऊ. ना.अजितदादा पालकमंत्री व अर्थमंत्री आहेत. विकास कामांसाठी ते बीड ला निधी कमी पडून देणार नाहीत. मतविभागणीचा फायदा भाजपाला होऊ नये म्हणुन सर्वांनी घड्याळ या चिन्हासमोरील तिनही बटन दाबुन नगर परिषदेत परिवर्तन घडवून आणा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी भागवत तावरे यांनी क्षीरसागर कंपनीचा खरपूच समाचार घेतला क्षीरसागरांनी मोमीनपुरा भागाला आपली जहागीरी समजून फक्त मतासाठी वापर केला असा घणाघात त्यांनी केला. याप्रसंगी शेख मुजिब, हमरून इरफान यांनीही मनोगत व्यक्त केले. दरम्यान बार्शीनाका व मोमीनपूरा येथील सभेला विराट गर्दी झाल्यामुळे राष्ट्रवादी व मित्रपक्षाच्या सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# प्रभाग १० मध्ये लोक विकास महाआघाडीच्या 'कपबशी'ला जनतेतून उत्स्फूर्त प्रतिसाद

## नगरसेवक पदासाठीचे उमेदवार सौ.राजेश्री अशोक मोदी व सय्यद ताहेर अब्दुल गफ्फार यांना मिळतेय जनतेची पसंती



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

लोक विकास महाआघाडीचे अंबाजोगाई नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांनी शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये नागरिकांच्या घरोघरी जाऊन गाठीभेटी घेऊन झंझावाती प्रचार केला. प्रभागातील आपले सहकारी प्रभाग क्रमांक १० मधील लोक विकास महाआघाडीचे ओबीसी (महिला) उमेदवार सौ.राजेश्री अशोक मोदी व सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार सय्यद ताहेर अब्दुल गफ्फार यांना सोबत घेऊन प्रभागातील मतदारांच्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन त्यांच्या गाठीभेटी घेत आशीर्वाद घेतले. जागोजागी पापा मोदींच्या 'कपबशी'ला जनतेतून मोठी पसंती व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील सर्व मतदारांना सहकार्य करण्याचे व मतदानरूपी आशिर्वाद देण्याचे आवाहन राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकारी उमेदवारांनी केले आहे. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १० मधील लोक विकास महाआघाडीचे ओबीसी (महिला) उमेदवार सौ.राजेश्री अशोक मोदी व सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार सय्यद ताहेर अब्दुल गफ्फार यांच्यासह शहराध्यक्ष मुख्तार (चाचू) शेख, शहर उपाध्यक्ष रशीदभाई सय्यद, भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले, माजी पाणीपुरवठा सभापती अमोल लोमटे, माजी नगरसेवक अशोक मोदी, हाजी खालेक साहब, खालेदभाई चाऊस, महेंद्र निकाळजे, सुनिल जगताप, राजेश परदेशी, फहेमीद फारूखी (नन्हा), ॲड.दयानंद लोंढाळ, ॲड.विलास लोखंडे, अशोक पालके, धिमंत राष्ट्रपाल यांच्यासह प्रभागातील अनेक युवा सहकारी सोबत होते. प्रभागातील या भेटी दरम्यान राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे मतदारांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत केल्या जात होते. त्याच बरोबर जागोजागी सुवासिनींकडून औक्षण देखील केल्या जात होते. यावरून राजकिशोर मोदी यांच्या प्रति सर्वधर्मीय मतदारांचा विश्वास, आपुलकी व प्रेम दिसून येत होते. अंबाजोगाई शहराचा मोदी कुटुंबियांवर विश्वास आहे. जनतेचे सहकार्य व आशीर्वादामुळे राजकिशोर मोदी हे सातत्याने अंबाजोगाई नगरपरिषदेच्या माध्यमातून शहर वासीयांची सेवा करीत आहेत. मोदी हे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत आपला सक्रिय सहभाग घेऊन त्यातून त्यांनी युवकांची एक नवीन फळी तयार केली आहे. गणेशोत्सव काळात अंबाजोगाई शहरातील गणेश मंडळाच्या ढोल ताशा वाद्य स्पर्धा घेऊन अंबाजोगाईचे ढोल पथक साऱ्या महाराष्ट्रभर पोहचविले आहे. त्याचबरोबर नवरात्र उत्सवात दांडिया स्पर्धेची उत्कृष्ट अशी स्पर्धा आयोजित करून येथील महिला, युवक व युवतींना एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून मोदी हे अंबाजोगाई शहरातील घराघरात पोहचले आहेत. अंबाजोगाई नगरपरिषदेच्या निवडणूक प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी हे त्यांनी आजपर्यंत केलेल्या विकासकामांच्या बळावरच यापुढेही मतदानरूपी आशीर्वाद मागत आहेत. अंबाजोगाई शहर हे एक कुटुंब म्हणून आपण काम केले असून येथील नागरिकांनी देखील भक्कम अशी साथ दिली आहे. यापुढेही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण सहकार्यांना पाठबळ देण्याचे आवाहन या प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी मतदारांना करीत आहेत. मतदार देखील खंबीरपणे मोदी कुटुंबाच्या पाठीशी राहण्याचे अभिवचन देतांना दिसून येत आहेत. शहरातील आठरापगड जाती धर्मातील मतदार, बारा बलुतेदार समाज बांधव, नवयुवक, महिला व जेष्ठ नागरिक यांच्याकडून मिळत असलेले प्रेम, आशीर्वाद पाहून मोदी व त्यांचे सहकारी भारावून जात आहेत.



# संस्कारातून व वर्तनातून मूल्यवर्धन होते - प्रा.डॉ. मुरकुटे

केज/प्रतिनिधी

जिल्हाशिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई आयोजित मुल्यवर्धन ३.० केज तालुकास्तरीय प्रशिक्षण साने गुरुजी निवासी विद्यालयात सुरू झाले असून या प्रशिक्षणाचा उद्घाटन समारंभ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाईचे वरिष्ठ अधिव्याख्याता प्रा.डॉ. मुरकुटे सर तर प्रमुख उपस्थित बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष ॲड. उध्दवराव कराड,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.दत्ता चाटे,श्रीमती पठाण मॅडम,कार्यक्रमाचे आयोजक जयपाल कांबळे सर,श्री.अरुण शिंदे सर,मुल्यवर्धन नोडल अधिकारी भारत मदने,मुल्यवर्धन तालुका समन्वयक श्री.चंद्रकांत मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. मुरकुटे सर म्हणाले की, भारतीय राज्यघटनेने न्याय,स्वातंत्र्य,समता आणि बंधुता जोपासणाऱ्या समृद्ध भारताचे स्वप्न पाहिले आहे.पुर्वीच्या काळी शिक्षकांबद्दल आदरयुक्त भीती मुलांमध्ये होते,वृध्द आई -बाबांना सांभाळले जात होते.कारण त्या काळी मुलांना घरातुन, शाळेतुन शिक्षणा बरोबरच त्यांच्यात असणा-या मुल्यांना वाव दिला जायचा,घरातुन संस्कार व्हायचे आता ते दिसुन येत नाही.उच्च दर्जाचे शिक्षण मिळत,साधने, सुविधा मोठ्या प्रमाणात आहेत पण कुठे तरी मुल्यांचे संवर्धन व वर्धन कमी होत असलेल्या सध्याच्या पिढीत जाणवत आहे.त्यामुळे एन.इ.पी. २०२० मध्ये मुल्य शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे आणि ते उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शिक्षकां मधले व विद्यार्थ्यां मधिल मुल्य वर्धित करणे गरजेचे आहे.अन्यथा उच्च शिक्षण असेल पण संस्कार हिन व मुल्यहीन पिढी असेल म्हणून मुलांमध्ये असणा-या मुल्यांना शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातुन वर्धित करण्या साठी शिक्षकांवर ही जबाबदारी दिली आहे आणि ती आपण योग्य पद्धतीने पार पाडाल उद्याचे भावी नागरिक लोकशाहीतील जबाबदार संवेदनशील आणि मुल्याधिष्ठीत नागरिक व्हावेत हेच या प्रशिक्षणाचा उद्देश आहे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ॲड.उध्दवराव कराड,दत्ता चाटे यांनी ही मनोगत व्यक्त केले या प्रशिक्षणास केज तालुक्यातील इयत्ता पहिली ते आठवीला शिकवणा-या सर्व शिक्षकांना दि.२७-११- २०२५ ते १३-१२-२०२५ या कालावधीत पाच टप्प्यात हे प्रशिक्षण डायटच्या वतीने देण्यात येत आहे.यात एकूण बाराशे शिक्षक हे प्रशिक्षण कालावधीत घेणार आहेत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपनर मॅडम यांनी केले



## नांदेड मध्ये राज्याचा गौरव!राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेत शिवम मोराळे याने मिळविले ब्राँझ पदक

केज/प्रतिनिधी

नांदेड येथे झालेल्या १२ व्या नॅशनल ड्रॅगन बोट चॅम्पियनशिप २०२५-२६ या प्रतिष्ठित स्पर्धेत प्रगती विद्यालय,बीड येथील इयत्ता सातवीत शिकणाऱ्या चि.शिवम अमोल मोराळे याने उल्लेखनीय कामगिरी करत ब्राँझ पदक मिळवून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील २५ राज्यांचे संघ सहभागी झाले होते. तीव्र स्पर्धेतही शिवम ने दमदार प्रदर्शन करत आपल्या क्रीडा क्षमतेची चमक दाखवली.शिवमच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाची दाद मिळत असून त्याच्यावर अभिनंदनांचा वर्षाव होत आहे.तो केज तालुक्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ड.उद्धवराव मोराळे यांचा नातू तसेच नांदुरघाट येथील डॉ. अमोल मोराळे यांचा मुलगा आहे.शिवमने मिळवलेले हे यश बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यासाठी अभिमानास्पद ठरत असून त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


# कडा येथे बाबाजी धोंडे स्मृती प्रित्यर्थ राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन – प्राचार्य डॉ.हरिदास विधाते

आष्टी - (प्रतिनिधी) आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी यांचे स्मृती प्रित्यर्थ आनंदराव धोंडे आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२५ विद्यार्थ्यांचे कला गुणांना वाव मिळण्यासाठी, नवनवीन विचार रुजवण्यासाठी, वक्तृत्व गुण कौशल्य वृध्दिंगत करण्यासाठी व संपन्न व्यक्तिमत्त्व निर्मितीसाठी १५ वर्षापासून सातत्याने ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. यावर्षी वक्तृत्व स्पर्धा बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वा. होणार आहे.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय आयोजित आनंदराव धोंडे

ऊर्फ बाबाजी यांचे स्मृती प्रित्यर्थ आनंदराव धोंडे आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न होत आहे. या स्पर्धेत सहभाग घेऊन वक्तृत्व कला वृद्धींगत करावी.

पारितोषिके प्रथम क्रमांक - १० हजार रु., स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक - ७ हजार रु. स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक - ५ हजार रु. स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ (दोन बक्षिस) १,५०० रु, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेचे विषय - अर्थव्यवस्थेतील स्टार्टअप - औद्योगिक नव क्रांती, महिलांचे नेतृत्व - बदलती मानसिकता, भारतीय लोकशाहीचा प्रवास - १९५० ते २०२५ हे विषय आहेत. या स्पर्धेचे पारितोषिक सांघिक प्रथम पारितोषिक - आनंदराव धोंडे फिरता करंडक व प्रमाणपत्र राहील. वैयक्तिक पारितोषिक - प्रथम क्रमांक - १० हजार रूपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक - ७,००० रु. हजार रुपये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक - ५,००० हजार रूपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र आणि उत्तेजनार्थ (दोन बक्षिसे) प्रत्येकी १,५०० रु. हजार रूपये व प्रमाणपत्र असे आहे. नियम व अटी - स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खुली राहील. स्पर्धकांनी आपले विचार मराठी भाषेत व्यक्त करावेत. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असून स्पर्धेसंबंधी नियमात काही कारणाने बदल करण्याचे हक्क संयोजकांनी राखून ठेवले आहेत. महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांच्या एका संघाला स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धक संघाने प्राचार्यांचे संमतीपत्र व ओळखपत्र स्पर्धे अगोदर संयोजन समितीकडे द्यावे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी खालील गुगल फॉर्म भरून नोंदणी करावी. खालील लिंकवर जाऊन व्हाट्सअप ग्रुप जॉईन करावा. दि. २३ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणीसाठीची गुगल फॉर्मची लिंक उपलब्ध राहील. ही संपूर्ण स्पर्धा (ऑफलाईन) म्हणजेच प्रत्यक्ष महाविद्यालयामध्ये घेतली जाणार आहे. सर्व स्पर्धकांनी व्हाट्सअप ग्रुपमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे. स्पर्धेसंदर्भात महत्वाचे अपडेट आपणास देण्यात येतील. स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शाखांच्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना खुली राहील. कनिष्ठ महाविद्यालयातील दोन व वरिष्ठ महाविद्यालयातील दोन असे एकूण चार स्पर्धकांना पाठविता येईल. प्रत्येक स्पर्धकाकडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे. संघाने प्राचार्यांचे संमतीपत्र संयोजकाकडे देणे गरजेचे आहे. स्पर्धेचे माध्यम केवळ मराठी भाषा असेल. प्रत्येक स्पर्धकाला ०५ + ०२ = ०७ मिनिटे वेळ दिला जाईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असून स्पर्धेसंबंधी नियमात काही कारणाने बदल करण्याचे हक्क संयोजकांनी राखून ठेवले आहेत. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येतील. प्रत्येक संघास १०० रु. प्रवेश फी राहील. स्पर्धकांची निवास व भोजन व्यवस्था केली जाईल. स्पर्धकांचा प्रवास खर्च संबंधित महाविद्यालयानी करावा. दोन किंवा त्याहून अधिक स्पर्धकास समान गुण मिळाल्यास पारितोषिक विभागून दिले जाईल. संयोजन



समिती - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे

अधिसभा व विद्यापरिषद सदस्य, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, उपप्राचार्य प्रा. डॉ. बी. एस. खैरे, प्रा. डॉ. जी. पी. बोडखे, प्रा. डॉ. एस. डी. गायकवाड, विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊन स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# सत्तेवर असो वा नसो, आम्ही सेवाकार्यच करतो

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा

बीड (प्रतिनिधी)

शहरातून गेल्या दोन-तीन दिवसांपासून मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. वातावरण चांगले झाले आहे. सर्व जाती-धर्मांना बरोबर घेऊन जाणारे उमेदवार दिल्यामुळे मतदारांचाही पाठिंबा मिळतो आहे. मात्र, दुर्दैवाने काहीजण अपप्रचार करून मतदारांना वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु आम्ही सत्तेवर असो वा नसो सेवाकार्य करतच आहोत. त्यामुळे मतदार आमच्या पाठीशी उभा राहतील, असा विश्वास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केला. गेल्या दोन दिवसांत विविध ठिकाणी झालेल्या कॉर्नर सभांना मोठा प्रतिसाद मिळू लागला आहे.

भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती रवींद्र घुमरे यांच्या समर्थनार्थ प्रत्येक प्रभागात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा संपर्क सुरू झाला आहे. आज प्रभाग क्रमांक बारा आणि प्रभाग क्रमांक एक येथे त्यांच्या कॉर्नर सभांचे आयोजन करण्यात आले होते. कपिल मुनी मंदिराच्या शेजारी असलेल्या अंकुश नगर भागात झालेल्या सभेत मतदारांचा मोठा प्रतिसाद होता. तसेच प्रभाग क्रमांक एकमध्येही जयदत्तअण्णा येणार या प्रतीक्षेत मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती रवींद्र घुमरे यांच्यासह उभे असलेल्या प्रभागातील उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे, असे



आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले की, बीड शहरात आम्ही जाती-धर्माला कधीच थारा दिला नाही आणि नेहमी विकासाच्या मुद्द्यावरच बोलतो. आम्ही कधी कुणावर टीकाही करत नाही. मात्र गेल्या काही दिवसांपासून आम्ही काय केले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यावरून स्पष्ट होते की, गेल्या अनेक वर्षांपासून मी बीड शहराच्या संपर्कात आहे. विकासाची कामे केल्यामुळेच बीडची जनता आम्हाला स्वीकारते. अत्यल्प उत्पन्न असतानाही बीड नगरपालिकेचा कारभार व विविध योजना सुरू ठेवण्यात आल्या. बीड शहरात झालेली कामे आजही ठळकपणे दिसून येतात.

बीडचा मतदार सुज्ञ असून कोण चांगला आणि कोण कामाचा आहे, हे तो ओळखतो. बीड पालिकेला दुरुस्त करायचे असेल, तर तज्ज्ञ डॉक्टरांची गरज आहे. त्यामुळेच प्रभाग क्रमांक १२ आणि प्रभाग क्रमांक १ मधून उभे असलेल्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे. तसेच संपूर्ण बीड शहरातून नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला मोठ्या संख्येने विजयी करून त्यांना सेवेची संधी द्यावी. विश्वास ठेवा, आम्ही दिलेला शब्द पाळतो. मतदान करून नागरिकांनी आपले कर्तव्य बजावावे. जय-पराजय सुरूच राहतो, पण शहराचा कौल हा नेहमी चांगल्याच बाजूने असतो. त्यामुळे बीड शहरातील आमचे सर्व नगरसेवक चांगल्या मताधिक्याने निवडून येतील. सोंग-ढोंग करून निवडणूक लढता येत नाही. भूलथापांना बळी पडून ही निवडणूक जिंकता येईल, असा जर कुणाचा भ्रम असेल, तर त्यांनी तो विसरावा. सत्ता असो वा नसो, आम्ही सेवाकार्य करतच आहोत. त्यामुळे मतदारांनी सर्व उमेदवारांना चांगल्या मतांनी निवडून द्यावे.

यावेळी डॉ. ज्योती रवींद्र घुमरे, डॉ. सारिका क्षीरसागर, दिनकर कदम, विलास बडगे, अरुण डाके, बाबुशेठ लोढा, अरुण बोंगाणे, सखाराम मस्के, रूपसिंह परदेशी, गौतम सोनवणे, अर्जुन बहिरवाड, आजिनाथ सोनवणे, दादासाहेब नरवणे, अंबादास गुजर, राहुल आघाव, संजय होळकर, सुभाष क्षीरसागर, चंद्रकांत पेंढारे, अशोक कुलकर्णी, नवनाथ कुलकर्णी तसेच प्रभाग क्रमांक १२ चे उमेदवार साहस आदोडे, पूजा राजाभाऊ गुजर, प्रभाग क्रमांक १ चे उमेदवार परमेश्वर धारकर, संगीता अशोक लोढा व प्रभागातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किल्ले धारूर चा विकास साधायचा असेल तर बालासाहेब जाधव यांनाच विजयी करा –महादेव शिनगारे

किल्ले धारूर / प्रतिनिधी

किल्लेधारूर नगरपरिषदेच्या निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाकडून निवडणूकीत उतरलेले उमेदवार बालासाहेब रामराव जाधव यांनाच बहुमताने विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष महादेव शिनगारे यांनी केले आहे.

किल्लेधारूर नगरपरिषदेत पक्षाने निवडणूकीसाठी दहा वार्डात विस उमेदवार उभे केले असून उमेदवार हे जनसंपर्कातील तसेच जनतेला आपले वाटणारे व काम करणारे आहेत.आ. प्रकाशदादा सोळंके हे माजलगाव मतदार संघांचे आमदार असून त्यांना किल्लेधारुर शहरातील प्रश्नांची जाण



असून अनेक विकासाची कामे केली आहेत. पुढेही जर किल्लेधारुरचा विकास साधायचा असेल तर नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बालासाहेब जाधव व पक्षाचे सर्व उमेदवार यांना बहूमताने निवडून आणा असे आवाहन राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव शिनगारे यांनी किल्लेधारूर मधील सुजाण मतदारांना केले आहे.

# महात्मा फुले आणि महाराणी ताराराणी: समतेचे पुरस्कर्ते, स्वराज्याचे रक्षक-डॉ. भारत कऱ्हाड

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी विचारांनी समाजाला दिशा देतात आणि कृतीने राष्ट्राची उभारणी करतात. महात्मा ज्योतिराव फुले आणि महाराणी ताराराणी ही दोन अशी तेजस्वी नावे आहेत, ज्यांनी आपल्या काळातील भीषण परिस्थितींवर मात करत समाज आणि स्वराज्याच्या रक्षणासाठी नवे मार्ग तयार केले. या दोन युगप्रवर्तकांचा वारसा आजही प्रेरणेचा अखंड दीपस्तंभ म्हणून उभा आहे.

महात्मा फुले यांनी समतेचा विचार केवळ शब्दांत नाही तर प्रत्यक्ष कृतीत उतरवला. जातिभेद, अस्पृश्यता, अज्ञान, स्त्रीशिक्षणाचा अभाव-या सर्व दुर्व्यवस्थांविरुद्ध त्यांनी कठोर संघर्ष केला. विद्येविना मती गेली या त्यांच्या तत्त्वज्ञानात शिक्षणाचे सामर्थ्य स्पष्ट दिसते. १८४८ मध्ये त्यांनी सुरू केलेली मुलींची पहिली शाळा ही भारतीय सामाजिक इतिहासातील क्रांतिकारी पाऊल होते. सावित्रीबाईंसह त्यांनी स्त्रियांच्या अधिकारांसाठी जे कार्य केले, ते आजही सामाजिक परिवर्तनाचा मजबूत पाया आहे. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेद्वारे त्यांनी समता, न्याय आणि विवेकावर आधारित नवे सामाजिक तत्त्वज्ञान पुढे मांडले. शेतकरी, दलित, स्त्रिया आणि सर्व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न भारतात नवजागरण घडविणारे ठरले.

छत्रपती ताराराणी भोसले राणीसाहेब यांनी मराठा साम्राज्याच्या सर्वात कठीण काळात नेतृत्वाची धुरा जबाबदारीने सांभाळली. छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर स्वराज्याचे अस्तित्व धोक्यात आले असताना त्यांनी धैर्य, शौर्य आणि दूरदृष्टी दाखवत संपूर्ण मराठा समाजाला पुन्हा उभारी दिली. संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांसारख्या वीर सरदारांना संगठित करून त्यांनी



मुघल दडपशाहीला प्रत्युत्तर दिले. युद्धकौशल्य, प्रशासन आणि न्यायनिष्ठ निर्णयक्षमता-या सर्व गुणांचा योग्य मेळ त्यांच्या नेतृत्वात दिसून येतो. त्या केवळ राजमाता नव्हत्या, तर स्वराज्याच्या रक्षणासाठी प्राणपणाने झटणाऱ्या अत्यंत बुद्धिमान आणि धैर्यवान नेत्या होत्या.महात्मा फुले यांनी समाजाला समानतेचा मार्ग दाखवला, तर ताराराणींनी स्वराज्यासाठी प्राणपणाने लढा दिला. एकाने विचारांची क्रांती घडवली, तर दुसरीने शौर्याची परंपरा घडवली. दोघांच्याही कार्यात स्वाभिमान, न्याय आणि मानवसेवा यांचं विलक्षण दर्शन घडतं.आज त्यांच्या स्मरणदिनानिमित्त त्यांना वंदन करणे म्हणजे त्यांच्या अपूर्ण कार्याला नव्याने ऊर्जा देणे होय. समता आणि स्वराज्य हीच त्यांची शिकवण-आणि हीच आपल्या भविष्यासाठी दिशा आहे.

डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# जय भीम... जय मीम... सत्तेची तक्ते पलटवणार ?

## अँड शफिक भाऊंचा पतंग मातबरांचे पत्ते कट करून उंच भरारी घेणार..!






बीड / वैभव स्वामी

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत शेवटच्या टप्प्यात आता खऱ्या अर्थाने रंगत आली आहे.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तुतारी एकतर्फी बीड नगरपालिकेत विजय मिळवेल असे वाटत असतानाच ऑल इंडिया मजलीस ए इत्तेहादूल मुस्लिमीन म्हणजेच एआयएमआयएम पक्षाने मुस्लिम मतदारांमध्ये आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध करण्यास सुरुवात केली आहे.या पक्षाचे जिल्हाध्यक्ष अँड शेख शफीक भाऊ यांची मुस्लिम समाजासह हिंदू समाजामध्ये असलेली प्रामाणिक छबी बीड नगरपालिकेमध्ये किमान पाच नगरसेवक स्वबळावर निवडून आणेल आणि नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत जय भीम... जय मीमचा नारा भल्या भल्यांची झोप उडवून मातब्बर पक्षांच्या उमेदवारांचे पत्ते कट करून एआयएमआयएम पक्षाचा पतंग बीड नगरपालिकेमध्ये उंच भरारी घेत स्वाभिमानाने उडेल अशी राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे. पतंगाला मिळणारे कसीर वोट तुतारीची पिपाणी करतील का ? अशी चर्चा रंगली आहे.

बीड नगरपालिकेची निवडणूक आता चांगलीच गुलाबी थंडीत पेटली आहे. सुरुवातीला बीड नगरपालिकेची निवडणूक दुरंगी होईल अशी चर्चा होत होती. मात्र निवडणुकांमध्ये राजकीय समीकरणे रात्रीतून बदलत गेली आणि बीड नगरपालिका निवडणुकीत चौरंगी लढत आता तुल्यबळ ठरत आहे. सुरुवातीला जेव्हा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी अचानक पक्ष सोडून भारतीय जनता पार्टीचे कमळ हातात घेतले त्यावेळी असे वाटले की आता शरदचंद्र पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि पालकमंत्री अजितदादा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या दोघांमध्येच सरळ लढत होईल. मात्र आता राजकीय समीकरणे पूर्णतः बदलली आहेत. नंबर एकला वाटणारी शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आता विश्वासाने जिंकण्याच्या उंबरठ्यावर राहिलेली नाही.एआयएमआयएम पक्षाचे जिल्हाप्रमुख अँड शेख शफीक भाऊ यांनी मुस्लिम बहुल वार्ड पिंजून काढले आहेत.मुस्लिम मतदारांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी पक्षाच्या मातब्बर नेत्यांनी उपस्थित राहून मुस्लिम मतदारांमध्ये विश्वास निर्माण केला आहे.

त्याचबरोबर अँड शेख शफीक भाऊ यांची छबी मुस्लिम समाजासह हिंदू समाजामध्ये सुद्धा सहानुभूतीपूर्वक असल्यामुळे ज्या मुस्लिम बहुल वार्डामध्ये हिंदू मतदार आहेत ते देखील आज नगरसेवक पदासाठी पतंगाच्या उमेदवाराला पसंती देताना चे अनोखे चित्र बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत दिसत असल्यामुळे आज आठ ते दहा जागेवर पतंग आपली निर्णायक भरारी घेत आहे. किमान तीन पेक्षा अधिक वार्डामधून ए आय एम आय एम चे पतंग विजय होईल आणि त्यांचे नगरसेवक निवडून येतील अशी शक्यता आहे. हे खालचे १९ वार्डातील उमेदवार आपल्या सोबत वर नगराध्यक्ष पदासाठी सुद्धा प्रामाणिकपणे पतंगालाच पसंती देत असल्यामुळे बीड नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीचे राजकीय समीकरणे बदलायला सुरुवात झाली आहे. जो ए आय एम आय एम पक्ष नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत चर्चेत सुद्धा नव्हता तो आता केंद्रबिंदू ठरला जात आहे. जर शेवटच्या टप्प्यात बहुसंख्येने मुस्लिमांची मते पाठीशी घेऊन हिंदू मतांमध्ये जर ए आय एम आय एम चे जिल्हाध्यक्ष अँड शफिक भाऊ परिवर्तन करू शकले ही मते देखील आपल्या पदरात पाडून घेऊ शकले तर अनपेक्षितपणे पतंगासोबतच विजयी होणाऱ्या उमेदवाराची फाईट होईल अशी शक्यता आहे. ऐनवेळी काहीही निर्णय लागू शकतो यात शंका नाही.

### बीड नगरपालिकेत अँड शफिक भाऊ यांची विधानसभेसाठी जोरदार बॅटिंग..

ए आय एम आय एम पक्षातर्फे बीड विधानसभेची निवडणूक अँड शेख शफिक भाऊ यांनी प्रामाणिकपणे लढवली.त्यांच्या पाठीशी मुस्लिम समाजासह हिंदू समाज देखील प्रामाणिकपणे उभा राहिला. राजकीय समीकरणात यश मिळाले नाही मात्र पराभवाची खंत निष्ठावंत पतंगाच्या कार्यकर्त्यांच्या मनात बोचत असल्यामुळे बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत पतंगाचा झेंडा निर्णायकरीत्या फडकावून अँड शफिक भाऊ सारख्या प्रामाणिक नेत्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार मुस्लिम बहुल मतदारांनी घेतल्यामुळे बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत शफिक भाऊ यांचे वारे वावटळ ठरणार आहे. या निवडणुकीतच आगामी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अँड. शेख शफिक भाऊ एक आश्वासक चेहरा म्हणून आजच पुढे येत आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सुरेखा शृंगारे सह १९ नगरसेवक चमत्कार करणार !

ए आय एम आय एम पक्षाच्या बीड नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार म्हणून उभ्या असलेल्या सुरेखा हर्ष शृंगारे आणि त्यांना वाजेद इनामदार यांची मिळालेली भक्कम साथ यामुळे त्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत चुरस निर्माण करत आहेत यात शंका नाही. यासह मुस्लिम बहुल वार्डामध्ये पक्षाचे तब्बल १९ तगडे उमेदवार उभे असून यापैकी आठ ते दहा उमेदवार विजयाच्या उंबरठ्यावर आहेत. तीन पेक्षा अधिक उमेदवार निवडून येण्याची शक्यता दाट आहे. यामुळे बीड नगरपालिकेचे राजकीय गणित बदलण्याची शक्यता आहे.

### हैदराबादचे आणि औरंगाबादचे नगरसेवक बीडमध्ये तळ ठोकून..

ए आय एम आय एम पक्षाचे डॅशिंग आणि मतदारांमध्ये विश्वास निर्माण करणारे हैदराबाद येथील दोन नगरसेवक आणि औरंगाबाद येथील दोन नगरसेवक बीड नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी बीडमध्ये तळ ठोकून आहेत. मतदारांमध्ये विश्वास निर्माण करत पतंगाची हवा करत असल्यामुळे आणि नगरपालिकेत निवडून कसे यायचे याची चावी माहीत असल्यामुळे हे चार नगरसेवक बीडमध्ये करिष्मा करणार असे चित्र आहे.




### हैदराबाद,तेलंगणाच्या आमदारांनी बीड शहर पतंगमय केले ?

ए आय एम आय एम पक्षाचे डॅशिंग लीडर म्हणून परिचित असलेले दबंग आमदार माजेद हुसेनी साहब आणि हैदराबादचे दबंग आमदार जाफर हुसेन साहब या दोघांनी रोड शो करत बीड शहरातील मुस्लिम बहुल भागामध्ये पतंगाची उंच भरारी घेत मतदारांमध्ये विश्वास निर्माण केल्यामुळे पतंगाची बाजू आणखीनच मजबूत झाली आहे.

### माजी खासदार इम्तियाज जलील यांचा करिष्मा..

ए आय एम आय एम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील यांना बीडसह जिल्ह्यामध्ये मानणारा मोठा वर्ग आहे. मुस्लिम समाजामध्ये त्यांची आश्वासक असलेली क्रेझ या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत प्रचाराचा शुभारंभच माजी खासदार तथा अभ्यासू पत्रकार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली झाल्यामुळे बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत पतंगाची उंच भरारी होणार यात शंका नाही.

---

# दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार किंवा शोषण करणे हा कायद्यान्वये गुन्हा आहे - राजेंद्र लाड

## आरोपींना थेट ६ महिने ते ५ वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद

आष्टी - (प्रतिनिधी) दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसा व शोषणाविरोधात दिव्यांग कल्याण विभागाने राज्यभर एकसमान कार्यपद्धती लागू केली आहे. जिल्हास्तरावर उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांनी तक्रारींची नोंद घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आता दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार किंवा शोषण झाल्यास आरोपींना थेट सहा महिने ते पाच वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. अशी माहिती दिव्यांग हितार्थ शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी दिली आहे.



दिव्यांग व्यक्ती असुरक्षित आणि इतरांवर अवलंबून असल्याने अत्याचार आणि हिंसाचाराच्या बळी ठरल्या आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमानुसार, दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या सर्व प्रकारच्या छळ, हिंसाचार आणि शोषणापासून संरक्षण देण्यासाठी उपाययोजना शासन करील. तसेच कलम ७ (१) (अ) नुसार शासन अशा घटनांची दखल घेईल आणि अशा घटनांच्या विरोधात कायदेशीर उपाय उपलब्ध करतील, असा नियम आहे. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणारा छळ, हिंसाचार आणि शोषणाविरुद्ध प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. सदर कार्यवाहीची प्रक्रिया दिव्यांग व्यक्ती हक्क नियमांतर्गत निश्चित करण्यात आली आहे. शासनाने दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा कठोर निर्णय घेतला आहे. दिव्यांग व्यक्तींचा छळ, हिंसाचार, शोषण झाल्यास आरोपींना थेट ६ महिने ते ५ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

दिव्यांग व्यक्तीविरोधी छळ, हिंसाचार आणि शोषणाच्या घटनांची दखल घेण्यासाठी, कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी काम पाहतील. पीडितांना वाचवणे, संरक्षण आणि पुनर्वसन करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे काम सक्षम प्राधिकारी करतील. सदरील निर्णय हा दिव्यांगांना सन्मानाने जगण्याचा हक्क देणारे ऐतिहासिक पाऊल आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही एकसमान कार्यपद्धती लागू झाल्यामुळे प्रशासकीय जबाबदारी वाढेल आणि दिव्यांगांना तातडीने न्याय मिळेल.दिव्यांगाच्याबाबत घडलेल्या छळ, हिंसाचार यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर सक्षम प्राधिकारी फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम १३३ ते १४३ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १५२ ते १६२) नुसार त्वरित कार्यवाही करतील. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार अनुपालन न केल्यास भारतीय दंड संहितेच्या, कलम १८८ (भारतीय न्याय संहिता, कलम २२३) नुसार शिक्षेस पात्र असतील.

पीडित दिव्यांग व्यक्ती, त्यांचे नातेवाईक, पोलिस किंवा कोणतीही स्वयंसेवी संस्था तक्रार दाखल करू शकते. तक्रार पोलिस ठाण्यात दाखल होताच ती तातडीने जिल्हा किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे वर्ग केली जाईल. विशेष म्हणजे, दंडाधिकारी स्वतःहूनसुद्धा अशा घटनांची दखल घेऊन कारवाई करू शकतात. असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी सांगितले आहे.

# गांधी महाविद्यालयाच्या मुलींचा बास्केटबॉल संघ विद्यापीठात प्रथम

खेळाडूंचा अनेक मान्यवरांकडून सत्कार

आष्टी - (प्रतिनिधी) तालुक्यातील कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या गांधी महाविद्यालयाच्या महिला बास्केटबॉल संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयास गौरवाचा सन्मान मिळवून दिला आहे. छत्रपती संभाजीनगर येथे दि. २३ व २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या बास्केटबॉल स्पर्धेत, गांधी महाविद्यालयाच्या मुलींनी अंतिम सामन्यात देवगिरी महाविद्यालयाचा ५७ - ४८ अशा गुणांनी पराभव करून विजयश्री मिळवली.

संघाला प्रा. डॉ. जमीर सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले होते. विद्यापीठ स्तरावर झालेल्या या यशामुळे संघास विविध मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत संघाच्या कु. निकीता बाबासाहेब पोकळे या खेळाडूची स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाल्याने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. या निमित्ताने सरपंच संदीप साहेब खकाळ, अजित डिसले सर, जितेंद्र बनकर, बंडु जाधव, बिबीषन पोकळे, बाबासाहेब पोकळे, संदीप जाधव, विक्रम नरवडे, बाळू पोकळे, उद्धव पोकळे, शिवम पोकळे, क्रीडा शिक्षक जमीर सय्यद, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सदस्य, संचालक मंडळ, प्राचार्य, सर्व स्टाफ, विद्यार्थी व पालक यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन केले.



---

# गेवराई शहराचा व्यापार आणि व्यवहार वाढविण्यासाठी नगर परिषदेची सत्ता द्या - अमरसिंह पंडित

## इतके वर्षे सत्ता भोगुनही दमदाटी करावी लागते, ही पराभवाची चाहुल आहे - कल्याण आखाडे

गेवराई (जिल्हा प्रतिनिधी शेख जावेद सर)

इतके वर्षे सत्ता भोगुनही दमदाटी करावी लागते, ही तर पराभवाची चाहुल आहे, स्वत:च्या फायद्यासाठी केलेली अभद्र युती गेवराईकरांना रुचणार नाही. लाडक्या बहिणींची उपस्थिती विजयाची साक्ष देणारी ठरत आहे असे प्रतिपादन कल्याणराव आखाडे यांनी केले. स्वत:च्या स्वार्थासाठी गेवराईकरांना वेठीस धरणार्यांना जागा दाखविण्याची वेळ आली आहे. शहराच्या विकासाचे व्हिजन घेवुन आम्ही मतदारांसमोर जात आहोत, गेवराई शहराचा व्यापार आणि व्यवहार वाढविण्यासाठी नगर परिषदेची सत्ता राष्ट्रवादीकडे द्या असे आवाहन अमरसिंह पंडित यांनी केले. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे व प्रभागातील उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी महिला मतदारांची लक्षणिय उपस्थिती होती. गुरुवार दि. २८ रोजी गेवराई शहरातील प्रभाग क्रमांक ४, ५ आणि ९ साठी आयोजित केलेल्या कॉर्नर बैठकीला मतदारांच्या रेकॉर्ड ब्रेक उपस्थितीमुळे जाहिर सभेचे स्वरुप प्राप्त झाले. राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, सुभाष महाराज नागरे, कालिदास नवले, एस.वाय. अन्सारी, गजानन काळे, दादासाहेब चौधरी, सौ. अंजुश्री मोटे, सौ. सिमाताई होंडे, किशोर कांडेकर आदींनी या प्रसंगी मनोगत व्यक्त केले. साप जहिरीला था, फिर भी हमने दुध पिलाया या शायरीने प्रास्ताविकाची सुरुवात करत जेष्ठनेते एस.वाय. अन्सारी यांनी सभेची सुरुवात करत गेवराईची बारामती करण्यासाठी विकासाला मत देण्याचे आवाहन केले. सत्तेत असतांना ज्यांना लोकांची कामे करता आली नाहीत, ते ही निवडणुक विकासाच्या मुद्यापासुन डायव्हर्ट करत आहेत. मी शब्दाचा पक्का आहे, विकासाचे व्हिजन घेवुन मतदारांसमोर आम्ही जात आहोत. मेन रोडची बाजार पेठ आम्हाला वाढवायची आहे, मंगल कार्यालये आणि शादीखाने उभा करायची आहेत. गेवराईचे मतदार बहाद्दर आहेत, त्यांनी मस्तावलेल्यांची मस्ती यापुर्वी उतरविली आहे, एकाची आई आणि दुसर्याची पत्नी यापुर्वी पराभुत केली आहे तेच मतदार आता भाभीला पराभुत करणार आहेत. शहराच्या विकासासाठी आम्ही कटीबद्ध असुन दळणवळणासह व्यापार वाढीसाठी जाणिवपुर्वक प्रयत्न करणार आहोत. जाती-पातीच्या पुढे जावुन शहराच्या विकासाच्या मुद्यावर राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मताधिक्याने विजयी करा असे अवाहन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. आपल्या भाषणात विरोधकांचे नाव न घेता त्यांनी केलेल्या टिकेला जोरदार प्रतिउत्तर दिले. लाडक्या बहिणींचा आशिर्वाद घड्याळाला आहे, आजची सभा निर्णायक विजयाची साक्ष देणारी आहे. विरोधकांच्या जातीयवादी अपप्रचाराला बळी पडु नका, निष्क्रीय लोकांना घरी बसवा, पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन गेवराई शहराची बारामती करण्यासाठी घड्याळा मतदान करा असे अवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी केले.



ही लढाई सामान्यांच्या हक्काची आणि अधिकाराची आहे, महेश दाभाडे हा सामान्यांचा आवाज आहे, त्यांच्या माध्यमातुन अमरसिंह पंडित यांनी सामान्यांच्या घरात उमेदवारी दिली असल्यामुळे सौ. शितलताई दाभाडे यांना नगराध्यक्ष पदाची संधी द्या असे अवाहन सौ. सिमाताई होंडे यांनी केले.

ही निवडणुक शहराच्या भविष्याची आहे, शहरात विकासाची गंगा आणुन आठरापगड जातींना सोबत घेवुन चालण्याची ताकद केवळ अमरसिंह पंडित यांच्यामध्ये असल्याने अशा सुसंकृत नेत्याला मतदान रुपी ताकद देण्याचे अवाहन सुभाष महाराज नागरे यांनी केले. विरोधकांना ही निवडणुक कशाची आहे आणि कोणावर बोलावे हेच समजत नसल्याचे रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांनी आपल्या भाषणात सांगितले. सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले यांनी आपल्या भाषणात विरोधकांच्या आजवरच्या टिकेला मुद्देसुद चोख उत्तर दिले. गेवराईकरांना भाभी नकोच असे सांगतांना गेवराईची लेक आणि सुन हीच नगराध्यक्ष पदी विराजमान पाहिजे अशी भावना व्यक्त केली.

यावेळी सभेला प्रभाग क्रमांक चार, पाच आणि नऊ मधील मतदारांची प्रचंड गर्दी होती. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई महेश दाभाडे यांच्यासह सौ. गंगासागर विठ्ठल पवार, भास्कर काकडे, विश्वजित शिंदे, सौ. संध्या राधेशाम येवले, विलास गुंजाळ, श्रीमती नजमा बेगम निजाम शेख,

सौ. संगिता दादासाहेब घोडके, शहारुख पठाण, अशोक गायकवाड, सौ. अजुंश्री महेश मोटे, सौ. वैशाली किशोर कांडेकर, श्रीमती जाकेरा बेगम ईस्माईल शरीफ, सौ. पुजा रजनीकांत सुतार, मनोज धापसे, सौ. अंजु संतोष सुतार, विनोद निकम, श्रीमती मंगलताई आत्माराम हजारे, श्रीकृष्ण मुळे, डॉ. रेणुका शिवलिंग संभाहरे, शेख खाजा हे प्रभागातील उमेदवार व्यासपिठावर उपस्थित होते.

# जालना येथील पत्रकार सुनील भारती यांना रांची येथे पत्रकार रत्न सन्मान पुरस्काराने गौरव

जालना ।प्रतिनिधी

दि. २६ नोव्हेंबर २०२५ युवा पत्रकार आणि इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे जालना जिल्हा उपाध्यक्ष श्री.सुनील कैलास भारती यांना त्यांच्या पत्रकारितेतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल पत्रकार रत्न सन्मान या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. झारखंड राज्याची राजधानी रांची येथे आयोजित ८ व्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन व पत्रकार सन्मान समारोहात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.माजी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी रांची येथील पलाश सभागृहात आयोजित या समारंभात माजी केंद्रीय गृहमंत्री श्री.सुबोधकांत सहाय आणि इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.सिराज अहेमद कुरेशी यांच्या हस्ते



सुनील भारती यांना सन्मानित करण्यात आले.प्रबंधभूमीचे जालना जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या श्री.भारती यांना मिळालेला हा सन्मान जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारा आहे.आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन आणि सन्मान समारोह इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन (खग-) च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला देशभरातील विविध राज्यांमधून जसे की तामिळनाडू, पश्चिम बंगाल,उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश,बिहार,आसाम, झारखंड,ओडिशा,छत्तीसगड, महाराष्ट्र,तसेच देशाबाहेरील नेपाळ येथूनही मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.हा समारंभ केवळ पुरस्कारांचा नसून,पत्रकार चर्चा आणि पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या खग- च्या कार्यावर आधारित होता.या संघटनेचे जालना जिल्हा उपाध्यक्ष म्हणून सुनील भारती यांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही पोचपावती आहे.आयोजकांकडून कौतुक या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे झारखंड प्रदेशाध्यक्ष श्री.देवानंद सिन्हा आणि राष्ट्रीय महिलाध्यक्षा सौ.मधु सिन्हा यांनी केले. पत्रकारांच्या हक्कांसाठी संपूर्ण भारतात कार्यरत असणारी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी झटणारी संघटना म्हणून इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनकडे पाहिले जाते.पत्रकार सुनील भारती यांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

# दुधा जिल्हा परिषद शाळेत नवोदयची तालुका स्तरीय सराव परीक्षा

## विद्यार्थ्यांसाठी दुधा शिक्षकांचा पालकांचा व गावातील नागरिकांचा अभिनव उपक्रम

तळणी ।प्रतिनिधी

जवाहरलाल नवोदय विद्यालयाच्या परीक्षेची वेळ जवळ आली असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा सुलभ व्हावी यासाठी मंठा तालुक्यातील दुधा येथिल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी, पालकांनी व गावातील नागरिकांनी सराव परीक्षेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेचे ता.२९ नोव्हेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी जालना, बुलढाणा, परभणी सह विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी परीक्षेस सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मंठा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, विस्तार अधिकारी के.जी.राठोड, संतोष गिऱ्हे, अभिमान बायस, यांच्या मार्गदर्शनाखाली व केंद्र प्रमुख एल. जे. खरात यांच्या संकल्पनेतून मुख्याध्यापक विजय कांगणे, सह शिक्षक निलेश पिसे, पंजाबराव दांदडे यांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या व ग्राम पंचायतीच्या मदतीने पुढाकार घेऊन नवोदय परीक्षेच्या स्पर्धा परीक्षेचे आयोजन केले होते. यावेळी विविध तालुक्यातून व जिल्हातून शेकडो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत



सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत श्रेणी नुसार बक्षिसांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुषंगाने प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कूलबॅग व इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर १२ बक्षिसांचे वाटप करण्यात आले .या मध्ये तेजश्री नारायण सस्ते मनीष शंकर मरकड प्रज्वल गणेश सुरुशे ज्ञानेश्वर बाळासाहेब काकडे सोहम भाऊसाहेब बहिर अनिकेत भागवत देशमुख निरंजन महादेव बोचरे श्रावणी भगवान मरळ नैतिक चेनसिंग घुनत कार्तिक राजू दिवटे आर्यन राजू चव्हाण कैवल्य संदीप जैन सूरज लक्ष्मण सोळुंके स्वराज कृष्णा डोंगरे श्रेया वैभव नागवे यांना मान्यवरांच्या शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले .

# केंद्र रोहिलागड बीटस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत जि.प.शाळा माहेर भायगावने पटकावला प्रथम क्रमांक

अंबड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यात शिक्षण क्षेत्रात नवे यश संपादन झाले आहे. तालुक्यातील जामखेड,शेवगा, कर्जत आणि रोहिलागड या चार केंद्रांची अत्यंत चुरशीची बीटस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा दि. २८ शुक्रवार रोजी केंद्र रोहिलागड येथे आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत रोहिलागड केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माहेर भायगावच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवून तालुक्याच्या लौकिकात भर घातली आहे. माहेर भायगाव शाळेच्या या देदीप्यमान यशाने त्यांची निवड थेट तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी झाली आहे.

विजयी विद्यार्थ्यांचे दमदार प्रदर्शन या विजयी संघात कु. युक्ती खांडेभराड,वैभवी राख आणि श्रवण दुधमल या हुशार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.त्यांच्या ज्ञानाच्या



जोरावरच शाळेला हे मोठे यश मिळाले आहे.मार्गदर्शकांचे मोलाचे योगदान या विद्यार्थ्यांच्या यशात शाळेचे मार्गदर्शक शिक्षक श्री. गिरी सर,श्री.बोंडारे सर आणि श्रीमती.नागरगोजे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.त्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळेच विद्यार्थ्यांना तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सिद्ध होता आले.

सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विजयी संघास व मार्गदर्शक शिक्षकांना केंद्रप्रमुख श्री. गंगावणे सर,तसेच गावकरी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.शहादेव कोळेकर, उपाध्यक्ष श्री.गोविंद वाघ आणि सर्व सदस्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.त्याचबरोबर, सरपंच श्री.अर्जुन वाघ,पालक आणि सर्व गावकरी मंडळींनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना तालुकास्तरीय स्पर्धेसाठी उत्साहाने शुभेच्छा दिल्या आहेत.

# जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा अंकुशराव टोपे महाविद्यालयाचा ओंकार वाघ महाराष्ट्र अंडर-१९ क्रिकेट संघात दाखल

जालना ।प्रतिनिधी

जालना येथील अंकुशराव टोपे महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक क्षण या महाविद्यालयाचा उदयोन्मुख आणि अष्टपैलू क्रिकेटपटू ओंकार वाघ याची थेट महाराष्ट्र १९ वर्षांखालील क्रिकेट संघात निवड झाली आहे.ओंकारच्या या लक्षवेधक कामगिरीमुळे जालना जिल्ह्याचे नाव आता राज्य क्रिकेटच्या नकाशावर ठळकपणे उमटले आहे.ओंकार वाघने ही निवड केवळ स्वतःच्या चमकदार खेळाच्या बळावर मिळवली नसून, त्याच्या महाविद्यालयाच्या अथक प्रयत्नांनाही मोठे श्रेय दिले जात आहे.जिल्हा ते राज्यस्तरीय



यशोगाथा

सर्वात आधी जिल्हा पातळीवर झालेल्या आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत अंकुशराव टोपे महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धेतही महाविद्यालयाच्या संघाने आपला दबदबा कायम ठेवत पुन्हा प्रथम क्रमांक मिळवला. या यशाच्या मालिकेनंतर नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत संघाने नेत्रदीपक कामगिरी केली.या संपूर्ण स्पर्धेत संघाचा अष्टपैलू खेळाडू ओंकार वाघ याची कामगिरी अत्यंत लक्षवेधक ठरली.फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमधील त्याच्या अप्रतिम योगदानामुळेच निवड समितीचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले आणि अखेर त्याची थेट महाराष्ट्र अंडर-१९ क्रिकेट संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून निवड झाली.अभिनंदनाचा वर्षाव

ओंकार वाघची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे संपूर्ण कुटुंब आनंदित झाले आहे. संस्थेचे अध्यक्ष मा.राजेशभैय्या टोपे,सचिव मा.मनिषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बी. आर.गायकवाड,सहप्रशासकीय अधिकारी राहूल भालेकर तसेच प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य संजय पाटील, उपप्राचार्य पांडुरंग खोजे यांनी ओंकारचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.क्रीडाविभाग प्रमुख भूजंग डावकर,प्रा.चंद्रकांत लाटेकर,प्रा.रामप्रसाद भालेकर, अधिक्षक सुरेश चव्हाण,डॉ. पंडित रानमाळ,डॉ.कार्तिक गावंडे,डॉ.रामदास वैद्य,डॉ. रामनाथ सांगुळे,डॉ.शंकर तिकांडे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी ओंकारला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या असून तो महाराष्ट्रासाठी दमदार कामगिरी करेल असा विश्वास व्यक्त केला आहे.ओंकारच्या या यशाने महाविद्यालयाचे क्रीडा क्षेत्रातील स्थान अधिक भक्कम झाले आहे.

# अंबडमध्ये भूतो न भविष्यति इतिहास घडवा नगराध्यक्षपदाची ती सुवर्णसंधी सोडू नका - पंकज मंडलिक यांचे रणशिंग फुंकले

अंबड ।प्रतिनिधी

आगामी अंबड नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण ढवळून निघाले असून, शिवसेनेचे शिंदे गट निष्ठावान कार्यकर्ते पंकज मंडलिक यांनी मतदारांना थेट आवाहन करत एक रणशिंग फुंकले आहे. नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी शिंदे साहेबांनी दिलेल्या उमेदवारीला सुवर्णसंधी मानून ती सोडू नका असे आक्रमक आवाहन मंडलिक यांनी केले आहे. ती संधी म्हणजे आपली लाडकी बहीण सना मुस्तकीम पटेल पंकज मंडलिक यांनी आपल्या भाषणात अत्यंत स्पष्ट आणि भावनिक साद घातली आहे. बांधवांनो अंबड नगर परिषदमध्ये नगराध्यक्षासाठी जी संधी आलेली आहे ती संधी सोडू नका असे बजावताना त्यांनी ही संधी म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली लाडकी बहीण असलेल्या सना मुस्तकीम पटेल यांना दिलेली उमेदवारी असल्याचे सांगितले.



आपण हुशार असाल तर या संधीचं सोनं करा आपल्या लाडक्या बहिणीला नगराध्यक्ष करा आणि आमच्या लाडक्या ताईला व इतर उमेदवारांना नगरसेवक करा पंकज मंडलिक शिवसैनिक शिंदे गट

काय केले नाही तर काय करू हे सिद्ध करा

मंडलिक यांनी विरोधकांच्या टीका-टिपणीवर जोरदार पलटवार करत मतदारांना संधीचं सोनं करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. यांनी काय केलं त्यांनी काय केलं यापेक्षा आलेल्या संधीच सोनं केलं म्हणून सांगा असे आक्रमकपणे सांगत त्यांनी शिवसेनेचा शिंदे साहेबांचा नगराध्यक्ष बसवण्यासाठी सर्वांनी एकजूट दाखवण्याचे आवाहन केले आहे.

खोतकर-हिकमत दादांचे हात बळकट करा या निवडणुकीच्या माध्यमातून अंबडमध्ये भूतो न भविष्यति इतिहास घडवण्याचे स्वप्न मंडलिक यांनी मतदारांसमोर ठेवले आहे. आमदार अर्जुनभाऊ खोतकर आणि हिकमत दादा यांच्यासह सर्वच निष्ठावान कार्यकर्त्यांचे हात बळकट करण्याची ही वेळ असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

आपली एकजूट दाखवा ही संधी जी आमची लाडकी बहीण सना मुस्तकीम पटेल यांच्या रूपाने शिंदे साहेबांनी आपल्याला दिली आहे ती सोडू नका. इतरांसारखी टीका टिपणी न करता काय करायचे ते करा पण मतदान या लाडक्या बहिणीला द्या आणि अंबड नगर परिषदमध्ये इतिहास घडवाअसे आवाहन करत मंडलिक यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

या आक्रमक आवाहनाने अंबडमधील निवडणुकीची रणधुमाळी अधिक तीव्र झाली असून शिंदे साहेबांच्या लाडक्या बहिणीला नगराध्यक्षपदी बसवण्यासाठी शिवसैनिकांनी कंबर कसल्याचे स्पष्ट दिसत आहे.

# रोहिलागड किल्ले परिसरात श्रमदान करून स्वच्छता

रोहिलागड ।प्रतिनिधी

रोहिलागड परिसरातील पाहणीदरम्यान गडावरील दगडी संरचनांवर झालेले नुकसान, तणझाडांची वाढ, पाणवठयांतील गाळ व कचरा याची नोंद घेतली. अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी श्रमदान करून परिसरातील कचरा, तण व गाळ हटवून स्वच्छता केली. किल्ल्यावर जाण्यासाठीच्या पायऱ्यांचे मजबुतीकरण, परिसरातील स्वच्छता, तसेच इतिहासविषयक माहितीपट फलकांची उभारणी ही कामे तातडीने करण्याची गरज असल्याचे जिल्हा परिषदेच्या सीईओ श्रीमती मिन्नु पी. एम. यांनी सांगितले. यासाठी ग्रामपंचायतीने सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करावा, असे निर्देशही देण्यात आले.जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारशातील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहिलागड किल्ल्याच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले. रोहिलागड हा इतिहासातील सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक असून त्याचे संरक्षण व पुनरुत्थान ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत



अंबड पंचायत समितीच्या वतीने गड-किल्ले संवर्धन व स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले. यावेळी सीईओ मिन्नू पी. एम. बोलत होत्या. कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी कोमल कोरे, गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी,सहाय्यक गटविकास अधिकारी समीर जाधव, सरपंच श्रीमती करुणा शामसुंदर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांनी सांगितले की, परिसरात नियमितपणे प्लास्टिक कचरा हटविणे, तण काढणे, झाडांची देखभाल, पाणवठ्यांची स्वच्छता, तसेच वाहतुकीसाठी योग्य व्यवस्था करणे ही कामे सातत्याने राबविण्याची गरज आहे. या मोहिमेत नागरिकांचा सहभाग सर्वात महत्त्वाचा असल्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. आगामी काळात किल्ला संवर्धन क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्था, ट्रेकर्स गट, युवक मंडळे व विविध सामाजिक संघटनांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमास अंबड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी वसंत बनाटे, ए. ए. चव्हाण, तालुका अध्यक्ष, एकुंडे ग्रामपंचायत अधिकारी शंकर चव्हाण, तसेच अनेक अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# संविधान जागर अभियाना अंतर्गत बार्टीच्या वतीने संविधानिक सापशिडी हा आगळावेगळा उपक्रम संपन्न

अंबाजोगाई प्रतिनिधी
(२९ नोव्हेंबर)

संविधान जागर अभियानांतर्गत अंबाजोगाई येथील श्री. मुकुंदराज माध्यमिक विद्यालय येथे बार्टीच्या वतीने संविधानिक सापशिडी हा आगळावेगळा व उपयुक्त उपक्रम उत्साहात संपन्न झाला. संविधान जागर अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, मार्गदर्शक तत्त्वे आणि नागरिकांचे हक्क यांची माहिती खेळाच्या माध्यमातून सुलभतेने मिळावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे - सामाजिक न्याय विभागाची स्वायत्त संस्था - यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक न्याय मंत्री श्री. संजय शिरसाट, बार्टीचे महासंचालक श्री. सुनील वारे, सामाजिक न्याय विभागाचे मुख्य सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड, सहाय्यक



आयुक्त, बीड श्री. प्रदीप भोगले, तसेच समतादूत प्रकल्प अधिकारी श्री. योगेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. अंबाजोगाई तालुक्याचे समतादूत श्री. व्यंकटेश जोशी यांनी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी संविधानिक सापशिडीचा खेळ घेण्यात आला. यातून विद्यार्थ्यांना संविधानाचे मूलभूत घटक आणि नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये-हक्क यांची माहिती रोचक पद्धतीने मिळाली.

या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. अमर मारोतीराव मुळे, सहशिक्षक सोमवंशी के.एस., पर्यवेक्षक अंबाड एस.जी., इंगळे एन.के., शितोळे एम.डी., गंगणे व्हि. तसेच अन्य शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपक्रमात इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

# स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेत आष्टा जिल्हा परिषद शाळा बीड जिल्ह्यात प्रथम

आष्टी - (प्रतिनिधी) भारत सरकारच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेमध्ये आष्टी तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरीनारायण या शाळेने बीड जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवत फाइव स्टार रेटिंग मिळवली आहे. जिल्ह्यात प्रथम मूल्यांकन मिळविल्यानंतर शाळेचे राज्यस्तरीय मूल्यांकन करण्यासाठी राज्याचे पथक शाळेला भेट देणार आहे. या मूल्यांकनानंतर शाळेची फाइव स्टार रेटिंग कायम राहिल्यास दिल्ली येथे शिक्षणमंत्री व मान्यवरांच्या हस्ते आष्टा शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व पाच विद्यार्थ्यांचा सन्मान केंद्र शासनाच्या वतीने केला जाणार आहे.

शाळेतील स्वच्छता, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, एक पेड माँ के नाम या कार्यक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग, पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय व इतर स्वच्छता विषयक बाबींची



पाहणी करून शाळेची निवड करण्यात आली आहे.

शाळेचे आदर्श व कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक मुटकुळे रघुनाथ, शाळेचे शिक्षक मच्छिंद्रनाथ जगताप, श्रीरंग खोकले, नामदेव भिसे, केंद्रप्रमुख धर्मनाथ शिंदे, विजय महाद्वार, उमेश झांबरे, सोमनाथ वाळके, बापू शिंदे, लक्ष्मण खंदारे, श्रीम. हेमलता तरटे, श्रीम. सुनंदा बांगर, श्रीम. सुषमा जाधव, अरूण पवार, अशोक रणसिंग, शिवाजी कोल्हे या सर्व शिक्षक वृंदाच्या व शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या सहकार्याने यश मिळाले आहे. यासाठी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक सोमनाथ वाळके सर यांनी विषेश परीश्रम घेऊन नोंदणी केली. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे आ. सुरेश आण्णा धस, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस, आष्टा गटाचे मा. जिल्हा परिषद सदस्य अमरराजे निंबाळकर, नामांकित मराठवाड्यात गौरविण्यात आलेल्या कडा पतसंस्थेचे अध्यक्ष मारूती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, सरपंच दैवशाला गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे, उपाध्यक्ष साईनाथ गळगटे व सर्व सदस्य यांनी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे व पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# दोन सत्ताधारी पक्षातच लढाई ची गर्जना भाजपा शिवसेना जोमात तर कॉंग्रेस कोमात ? असल्याचे दिसते





मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड येथील नगर परिषदेच्या निवडणूकीत आता रंग भरला असून राज्यात सत्ताधारी असलेल्या भाजपा-शिवसेना शिंदे गटातच प्रमुख लढत होत असून सर्व ताकदिनीशी लढू म्हणणारी कॉंग्रेस मात्र कोमात ?अल्याचे दिसून येत आहे. राज्यात महाआघाडी म्हणून असणा-या शिवसेना उबाठा,राष्ट्रवादी कॉंगेस(शरद पवार गट),शेकाप व वंचितला कॉंगेसने वा-यावर सोडले असून या पक्षातील कार्यकर्त्यांना शिवसेना शिंदे गटाचा आसरा घ्यावा लागला आहे. भाजपा व शिवसेना शिंदे गट सर्व ताकदिनीशी लढत असून नगराध्यक्षासह सर्व नगरसेवकांना निवडूण आणण्यासाठी आ.डॉ.तुषार राठोड व बंधू माजी नगरसेवक गंगाधर राठोड हे बंधूद्वय पहाटेपासूनच मतदारसंघ पिंजून काढत आहेत. ही निवडणूक माजी आ.कर्मवीर किशनराव राठोड व दलितमित्र गोविंदराव राठोड यांच्या पश्चात होत आहे. मुखेडची जनता कोणाच्या पदरात मताचे दान टाकते हे ३ तारखेला स्पष्ट होणार आहे. आ.डॉ.तुषार राठोड यांनी भाजपाकडून नगराध्यक्ष पदासाठी आपले विश्वासू कार्यकर्ते व वैश्य समाजासह सर्व समाजातील गरजूंच्या मदतीला धावून जाणारे राम सावकार पत्तेवार यांच्या सौभाग्यवती विजया राम पत्तेवार यांना उमेदवारी दिली आहे.पत्तेवार घराण्याला राजकीय वारसा नसला तरी कै.गोविंदमामा पत्तेवार यांच्या रुपाने धार्मिक वारसा लाभला आहे. पक्षासह सर्व पत्तेवार फॅमिली व पाहुणेमंडळी प्रचारात दिसून येत आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून माजी नगराध्यक्ष बाबु सावकार देबडवार यांच्या भावजय विजया धोंडुराम देबडवार या उभ्या आहेत. आपल्या आईला निवडूण आणण्यासाठी डॉ.अतुल सावकार देबडवार हे सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.त्यांनी मुखेडच्या विकासासाठी मत मागीतले आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या प्रचार सभेनंतर कार्यकर्त्यात जोश निर्माण झाला आहे. विधानसभेला पराभूत झालेले अपक्ष उमेदवार बालाजी पाटील खतगांवकर यांच्या आधारावर उभ्या असलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या टिमला पाठबळ देणे गरजेचे दिसून येते. कॉंग्रेसकडून उच्चशिक्षित उमेदवार डॉ.दिपाली श्रावण रॅपनवाड या आपले नशिब अजमावत आहेत.त्या कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस डॉ.श्रावण रॅपनवाड यांच्या पत्नी आहेत. डॉ.श्रावण रॅपनवाड यांचा प्रवास भाजपापासून सुरु झाला असला तरी ते आज कॉंग्रेस पक्षात वरिष्ठ पदावर आहेत.शहरातील विविध प्रश्न घेवून ते आजपर्यंत लढत आले आहेत.सर्वसामान्यांचा नेता म्हणून ते परिचित असले तरी त्यांना स्थानिक पक्षनेतृत्वाने वा-यावर सोडल्याचे दिसून येते. मुखेड नगर पालिका निवडणूकीत २० उमेदवार उभे करावयाचे असताना सुध्दा राष्ट्रीय स्तरावर काम करणा-या कॉंग्रेस पक्षाला सर्व ठिकाणी उमेदवार उभे करता आले नाहीत, कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना दुस-या पक्षाकडून उमेदवारी घेवून उभे टाकण्याची नामुष्की ओढवली आहे.

# स्वारातीम विद्यापीठातील प्रा. आर. एस. माने यांच्या संशोधन प्रयोगशाळेचा विक्रम

## एका वर्षात २० संशोधन लेख स्कोपस-जर्नलमध्ये प्रकाशित



नांदेड ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. राजाराम एस. माने यांच्या संशोधन प्रयोगशाळेने यंदा उल्लेखनीय यश मिळवत, एका वर्षात तब्बल २० संशोधन लेख स्कोपस-सूचीबद्ध नियतकालिकांमध्ये प्रकाशित करण्याचा अभूतपूर्व विक्रम नोंदविला आहे.

उत्कृष्ट संशोधन कार्य, सातत्यपूर्ण अभ्यास, तांत्रिक कौशल्य आणि नेतृत्वक्षमता यांच्या जोरावर प्रा. माने यांनी आजवर मिळविलेल्या एकूण संशोधन कामगिरीत मोठी भर पडली आहे. सध्या त्यांचा एच-इंडेक्स ७०, एकूण १८,३०७ उद्धरणे (सायटेशन्स), तसेच आयटेन-इंडेक्स ३२२ असा प्रभावी शैक्षणिक दर्जा असून, हे त्यांच्या संशोधन क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाचे द्योतक आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पसमध्ये इतक्या उच्च दर्जाचे, प्रेरणादायी आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेले संशोधक आणि मार्गदर्शक कार्यरत असल्याचा अभिमान आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील संशोधन गटाने केलेली ही कामगिरी विद्यापीठाच्या संशोधन परंपरेला नवी दिशा देणारी ठरली आहे.

विद्यापीठ प्रशासनाकडून कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. डी. एम. खंदारे, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचारी यांनी प्रा. राजाराम एस. माने आणि त्यांच्या संपूर्ण संशोधन टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# कृष्णर एमआयडीसी मध्ये बिबट्याचा हल्ला! तरुण गंभीर जखमी

## परिसरात भीतीचे वातावरणर वनविभागाचे शर्यतीचे प्रयत्नं चालू



नायगाव ।प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या बरबडा येथील तरुण कृष्णुर एमआयडीसी परिसरात बुधवारी सकाळी बिबट्याने अचानक हल्ला चढवून श्रीकांत शिवाजी पुलवाड हा तरुण नेहमी प्रमाणे जाने येने करीत असताना गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून गावकऱ्यांत भीतीचे सावट पसरले आहे. जखमी पुपलवाड यांना तातडीने घुंगराळा येथील डॉ. राठोड यांच्या दवाखान्यात हलवून प्राथमिक उपचार करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच वसंत सुगावे पाटील यांनी रुग्णालयात धाव घेत जखमी तरुणाची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी त्यांनी वनपरिक्षेत्राधिकारी देवकत्ते यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून घटनास्थळावरील परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांची टीम तातडीने घुंगराळा-कृष्णर परिसरात दाखल होऊन बिबट्याच्या शोधासाठी मोहिम हाती घेतली.वनविभागाने परिसरात गस्त वाढवली असून बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष पिंजरा लावण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, घुंगराळा, कृष्णुर आणि एम आयडीसी परिसरातील नागरिक, शेतकरी, कामगारांनी अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बिबट्या कुठेही दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही अधिकाऱ्यांनी केले आहे.वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.बिबटयाला पाडण्यासाठी वनविभागाने शर्थीचे प्रयत्न चालू होते

# हिमायतनगर नगरपंचायत निवडून आणण्याकरिता रामराज्य प्रस्थापित करा धनुष्यबाणाला निवडून आणा




हिमायतनगर ।प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री एकनाथ भाई आपल्या पाठीमागे असल्यामुळे आपल्या शहराचा विकास ऐतिहासिक प्रकारे होईल आणि गेली तीस वर्षापासून शिवसेनेमध्ये असलेले रामभाऊ ठाकरे यांच्या माध्यमातून आपल्याला हिमायतनगरचा विकास करायचा आहे आणि आपल्या पाठीमागे आपले लाडके आमदार बाबुरावजी कोळेकर हे सुद्धा आपल्या तालुक्याचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्याला भरपूर काही यश मिळेल आणि प्रत्येक गोष्टीला आपल्याला सहकार्य राहील विकासापासून कोसो दूर असलेल्या हिमायतनगर नगरपंचायत ला आपल्याला पुढे आणायची जर असेल तर रामभाऊला मतदान करा पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी पाणीपुरवठ्यासाठी हिमायतनगर तालुक्याला भरघोस निधी देण्याची ग्वाही दिली .दिनांक २८ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी या ठिकाणी भाजपची व शिवसेनेची दोन्ही दोन्ही सभा पार पडल्या भाजपच्या सभेमध्ये अशोकराव चव्हाण यांनी गुलाबराव वर टीका केली अशोकराव का टीका करतात असे गुलाब राव पाटील चे म्हणणे होते त्यांचे पिढ्यान पिढ्या राजकारण चालू आहे तर इतकी दुरावस्था का हिमायतनगर कुठेही रस्ते नाहीत गल्लीमध्ये बोळीमध्ये घाण सगळी असल्यामुळे लोकांना त्रास होत आहे अशोकराव जनतेमध्ये संभ्रम निर्माण करीत आहेत असे गुलाबराव पाटलांची टीका केली यावेळीबाबुराव पाटील कोहळीकर म्हणाली की जनतेने सावधान पणाने मतदान करावे राज्यात एकनाथ बाईच्या माध्यमातून अनेक विकास कामे झालेले आहेत यापुढेही विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक नगराध्यक्ष यांना भरघोस मतांनी निवडून द्या असे आव्हान बाबुराव कोळेकर यांनी केले यावेळेस शिवसेनेचे उपनेते खासदार हेमंत भाऊ पाटील बाबुराव कोळीकर जिल्हाप्रमुख विवेक देशमुख यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व मतदार बंधू आणि भगिनी यांची उपस्थिती होती

# किनवट निवडणूक : प्रस्थापितांना धक्का, मजुरांना सुट्टी, आणि प्रचाराला ओव्हरटाईम

## थंडी वाढली, तणाव वाढला; किनवटचा प्रचार अंतिम टप्प्यात

किनवट ।प्रतिनिधी

किनवट नगर परिषद निवडणुकीने यंदा प्रस्थापितांच्या खुर्च्यांखालील पायच जणू काढून घेतले आहेत. अनेक ठिकाणी 'नवख्या' उमेदवारांना संधी मिळाल्याने निवडणूक चित्रपटाच्या क्लायमॅक्सप्रमाणे रंगत चढली आहे. आयत्यावेळी महायुतीचे घटक पक्ष एकत्र आल्याने अनेक राजकीय पंडितांचा 'जातीय गणित' चा हिशेब कोलमडून पडला आहे. विशेष म्हणजे दोन्ही मुख्य ध्रुव-महाविकास आघाडी आणि महायुती-यांच्याकडून उभ्या असलेल्या महिला उमेदवार एकाच धर्माच्या असल्याने, नेहमीचा 'धर्माचा रंग' वापरण्याची संधी मोठ्या पक्षांना गमवावी लागली आहे. त्यामुळे यंदा निवडणूक सरळ जात-धर्म सोडून विचारधारा या फॉर्म्युल्यावर आली आहे, हेही नवेच!

दरम्यान, सर्वच मोठे पक्ष ५ ते ११ जागांसाठी तळ ठोकून बसले असले, तरी प्रत्यक्षात कोणालाच ५ जागांचा टप्पा पार करणे शक्य दिसत नाही. अशा परिस्थितीत २ ते ३ अपक्ष उमेदवार निवडून येतील, अशी दाट शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. म्हणजे 'मोठ्यांचा खेल बाजूला, आणि अपक्षांचा मेळा पुढे' असे चित्र हळूहळू स्पष्ट होत आहे.

युवकांना प्रेरणा देण्यासाठी किंवा मतदारांचे अश्रू पुसण्यासाठी राज्यातील मोठे नेते यावे अशी अपेक्षा होती; मात्र कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचे काही राज्यस्तरीय नेते सभेला येऊन निघून गेले तरी, प्रमुख लढाऊ पक्षांचे 'बडे बाबू' यांनी किनवटची पायरीसुद्धा चढली नाही. त्याउलट भाजपा तर्फे आ. भीमराव केराम आणि ड. प्रतीक केराम यांचा मोर्चा सतत धावतोय. शिवसेना उ.बा.ठा कडून खा. नागेश पाटील आष्टीकर, जिल्हा प्रमुख ज्योतिबा खराटे आणि राष्ट्रवादी (शरद पवार पक्ष) नेत्या बेबीताई नाईक हे प्रचारक मंचावर जोशपूर्ण उपस्थिती लावत आहेत.

यंदा एक अतिरिक्त प्रचारदिवसाचा बोनस सर्व पक्षांना बहाल करण्यात आला असून, १ डिसेंबर रात्री १० वाजेपर्यंत प्रचाराला परवानगी मिळाल्याने गल्लोगल्लीत ढोल-ताशा, माईक आणि फटाक्यांचा आवाज शिगेला पोहोचला आहे. मतदारांची आनंदाची पातळी वाढली असून उमेदवारांची तपासणीची पातळी आणखी कठीण झाली आहे.

राज्यस्तरावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अतिवृष्टीची बिकट परिस्थिती, बीडमधील वाढती गुन्हेगारी, प्रदूषण, आणि पवार कुटुंबातील जमीन खरेदी प्रकरण - हे मुद्दे मात्र पूर्णपणे चुनावी धुळीने झाकले गेले आहेत. त्यांच्या जागी 'लक्ष्मी दर्शन', दारू वाटप, निधीचे पाण्यासारखे वहात जाणे, यांसारख्या बातम्यांचा पूरच दररोज वाहत आहे. बाजारपेठांमध्ये पैसा इतका ओतला जात आहे की मजूर वर्गालाही रोजच्या कष्टाच्या कामाची आठवण धूसर होत चालली आहे. प्रचारासाठी मनुष्यबळाची एवढी मुबलक उपलब्धता आहे की गृहिणी सुद्धा सकाळ-दुपारच्या मोर्चांत हजेरी लावून दिवसाला पाचशे-हजार रुपये मजुरी 'उचलत' आहेत. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला जणू तात्पुरता 'कृत्रिम उत्साहाचा झोत' आला आहे.

प्रशासन मात्र निवडणूक शांततेत आणि अखंडपणे पार पडावी यासाठी कंबर कसून उभे आहे. थंडी मात्र निवडणुकीच्या वातावरणाशी 'टायमिंग' सांभाळत दोन दिवसांपासून पुन्हा जोरात सेट झाली आहे. आता तिचा हा जोश निकालापर्यंत टिकतो का, हे पाहणेही तेवढेच रंजक ठरणार आहे.

# भाजप उमेदवार च्या प्रचारात दिग्गज उतरले मैदानात.

## हदगांव नगरपरिषद निवडणुकीत भाजप उमेदवार च्या प्रचारात वेग

**तामसा ।प्रतिनिधी**

**नगरपरिषद हदगांव येथे भाजप शिवसेना युति लढतीबाबत चित्र स्पष्ट झाल्याने भाजप च्या उमेदवाराच्या प्रचारार्थ भाजप चे नेते आज उमेदवारा सोबत प्रचार करत घरो घरी भेटी दिल्या . नांदेड जिल्ह्यातली महत्वाची नगर पालिका म्हणून हदगाव नगर पालिकेला विशेष महत्व आहे. हदगांव नगरपरिषद च्या प्रभाग १(अ) चे उमेदवार**

काळे अरुणा गुणवंत,प्रभाग क्र. १(ब) चे उमेदवार सचिन गोविंदराव सूर्यवंशी,प्रभाग ४(अ) चे उमेदवार बाभुळकर रुखमाबाई पिराजी व प्रभाग ५(ब) चे उमेदवार कदम बालाजी पांडुरंग हे उमेदवार असून मा. मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण व जिल्हा अध्यक्ष ऍड किशोर देशमुख यांनी हदगांव नगरपरिषद वर व्यक्तिगत लक्ष देत आपल्या पक्षांचे उमेदवार ला विजय करण्यासाठी मिशन हदगांव मनहून हदगांव तालुक्यातील दिग्गज भाजप स्टार प्रचारक मनहून भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुरेश सारडा, जिल्हा सरचिटणीस तातेराव वाकोडे पाटील,तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर, आनंद भंडारी, शिरीष मनाठकर, अविनाश शहाणे, सुशील नावडे, जिल्हाउपाध्यक्ष पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती, डॉ. भगवान निळे, डॉ दिपक नाईक, जेष्ठ भाजप नेता भारती ताई कराळे, विद्याधर देशमुख, उमाकांत भोरे, महिला आघाडी तालुका अध्यक्ष ममता जोशी यांना भाजप उमेदवार च्या प्रचारात वेग देण्यासाठी मतदारांना' डोर टू डोर 'गाठीभेटी सुरु केली असून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## बरबडा ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे बरबडा येथे १० - १२ दिवस गावात पाणी पुरवठा बंद ग्रामस्थ संतप्त

नायगाव ।प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे बरबडा गावात १० १२ दिवसांपासून पाणी पुरवठा बंद आहे. बरबडा सर्कल चे गाव आहे. या गावात १५ सदस्य आहेत व नऊ दाहाजार गावातील लोक संख्या आहे बरबडा ग्रामपंचायतींच्या निष्काळजी पणामुळे बरबडा येथे अनेक कारणें सागने चालू आहे आहे गावातील वार्ड २ क्रमांक चार मध्ये गल्ली गल्ली आठ ते दहा ते दिवस झालं पाणी नसल्यामुळे संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालय वर घागर मोर्चा काढण्याच्या मार्गावर आहेत सरपंच व ग्रामसेवक आणि प्रशासन यांचा निष्काळजीपणामुळे ग्रामपंचायतीने कार्यालयल जर दोन दिवसात पाण्याचा प्रश्न नाही मिटला बरबडा गावातील महिला भगिनी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे दोन तिन दिवसांत पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावे अशी मागणी होत आहे.

बरबडा येथील ग्रामविकास अधिकारी सुर्यकांत बोडले यांना पाणीपुरवठा कदि सुरूवात होणार याबाबत माहिती विचारण्यासाठी फोन केला असता फोन बंद होता

# कंधार नगरपालिकेवर कोणाचा झेंडा ?




कंधार :- प्रतिनिधी

कंधार नगपालिकेची स्थापना १९५६ दरम्यान झाली तेव्हापासून बऱ्याच पक्षाचे नगरअध्यक्ष या नगपालिकेवर सत्ता काबीज केली.अनेक नेत्यांनी सुद्धा पालिकेचे नेतृत्व केलं.पालिकेला अनेक पुरस्कार हि मिळाले आहेत.महाराष्ट्रात कंधार नगरपालिकेचा दर्जा महाराष्ट्राच्या यादीत आहे पण येथील राजकारण व प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे कंधार शहराच्या अनेक समस्या कायम असून २०२५ ची सत्ता हा मतदार कोणाला देणार आणि नगरपालिकेवर कोणाचा झेंडा असेल याची चर्चा प्रभागात होत आहे.

२०१६ च्या कंधार नगरपालिका निवडणुकीमध्ये कॉंग्रेसचा नगराध्यक्ष विजयी झाला होता तर बहुमत शिवसेनेला मिळाले होते. यंदा नगराध्यक्षपद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव असून राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस आणि भाजपामध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तीन्ही पक्षाच्या उमदेवारांनी शहरात जोरदार प्रचाराला सुरवात केली असली तरी विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक होणार असल्याचे चित्र साध्य गल्लीबोळातील ज्येष्ठ तरुणाईत चर्चा आहे.

कंधार न. पा. आदर्श तालुका बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता यामध्ये वारेमाप बजेट परत करण्यात आले होते. असे असताना नियोजित वेळेमध्ये विकासकामे पूर्ण करण्यास तालुक्याला अपयश आले आहे. दुसरीकडे तक्रारी पाहता संकुलन कधी,याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहराला जोडण्यासाठी रस्ते उभारण्याची घोषणा कागदावरच राहिली आहे. राज्य मार्ग शहरातून जोडण्यास पुढारी व प्रशासनाला अपयश आले आहे.शहराच्या पायथ्याशी असलेली वस्ती आसान नगर आणि भीमगड मूलभूत सोई सुविधेपासू आजही वंचित असून कंधार २०२५ नागेगपालिकेवर कोणाचा झेंडा फडकेल हे येत्या तीन तारखेल पाहावे लागेल.